- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, १३ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४५ | किंमत : २ रूपये

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५३,७०० /-
- २३ कॅरेट : १,५३,३५० /-
- चांदी : २,४८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# पेपरफूट गैरप्रकारबाबत केंद्राचा कायदा राज्यात लागू

## महसूल स्तरावर होणार विद्यार्थी संवाद, पेपरफूट, परीक्षा गैरप्रकार संदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार, २५ हजार सुरक्षित क्लासरूम उभारणार, विशेष आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या. राज्यात गेल्या काही वर्षात सातत्याने होत असलेल्या पेपरफुटी, आणि महत्वाच्या



परीक्षांमधील घोळांच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला.

वर्षा निवासस्थानी आज विशेषत्वाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे निर्देश दिले. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरेल.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# मणिपुरात पुन्हा हिंसाचार



**वृत्तसंस्था, कांगपोकपी**

मणिपूरमधील कांगपोकपी जिल्ह्यातील एका नागा गावावर झालेल्या हल्ल्यात किमान ९ घरे जाळण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. ही घटना मंगळवारी रात्री सुमारे ९.३० वाजता टोकपा लियांगमै नागा गावात घडली.

एका सशस्त्र जमावाने कथितपणे गोळीबार केला आणि त्यानंतर नऊ घरांना आग लावली. यातील बहुतांश घरे कच्च्या स्वरूपाची होती. जवळच्या गावांतील रहिवासी घटनास्थळी धावून गेले आणि आग आटोक्यात आणण्यासाठी मदत केली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी त्या भागात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले. लियांगमै नागा काउन्सिल, मणिपूरने या घटनेचा निषेध केला आणि दुसऱ्या समुदायातील सशस्त्र व्यक्ती या हल्ल्यामागे असल्याचा आरोप केला. या हल्ल्यात १० घरे आणि एक चर्च जाळण्यात आल्याचा दावा देखील काउन्सिलने केला.

निष्पाप नागरिक, निवासी मालमत्ता आणि उपासनेचे ठिकाण यांना मुद्दाम लक्ष्य करणे ही अत्यंत गंभीर आणि निंदनीय हिंसक कृती आहे असे काउन्सिलने निवेदनात म्हटले आहे. या जाळपोळीस जबाबदार असलेल्यांना तातडीने अटक करून त्यांच्यावर खटला चालवण्याची मागणी नागा संघटनेने केली. तसेच या भागातील सुरक्षा व्यवस्था तातडीने अधिक मजबूत करण्याचीही मागणी करण्यात आली.

थोडक्यात

## ३,७१८ मोबाइल ॲप्स ब्लॉक!

**नवी दिल्ली :** ऑनलाइन फसवणुकीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. फसवणूक करणाऱ्या लोन ॲप्ससह तब्बल ३,७१८ मोबाइल ॲप्स ब्लॉक करण्यात आले आहेत. केंद्रीय गृह राज्यमंत्री बंदी संजय कुमार यांनी नुकतीच लोकसभेत ही माहिती दिली. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, ३० जून २०२६ पर्यंत भारतीय सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटरकडून ही कारवाई करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० मधील कलम ६९(अ) आणि ७९(३) अंतर्गत हे ॲप्स ब्लॉक करण्यात आले आहेत. मोबाइल ॲप्ससोबतच संशयास्पद सिम कार्ड आणि मोबाइल उपकरणांवरही सरकारने कारवाई केली आहे. विविध पोलीस यंत्रणांकडून मिळालेल्या अहवालांच्या आधारे १५.७५ लाखांहून अधिक सिम कार्ड आणि ५.७७ लाख आयएमए नंबर ब्लॉक करण्यात आले आहेत. यामुळे सायबर गुन्ह्यांसाठी वापरले जाणारे मोबाइल कनेक्शन आणि उपकरणे बंद करण्यास मदत झाली आहे. अनेक मोबाइल ॲप्सच्या माध्यमातून नागरिकांना आकर्षक कर्ज देण्याचे आमिष दाखवले जाते. त्यानंतर नागरिकांकडून पैसे उकळणे, वैयक्तिक माहिती मिळवणे किंवा इतर प्रकारे फसवणूक केल्याच्या तक्रारी समोर येतात. अशा फसव्या लोन ॲप्ससह नागरिकांची फसवणूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ॲप्सवर सरकारने कारवाई केली आहे.

# इम्रान खान यांचा मृत्यू?

**वृत्तसंस्था, इस्लामाबाद**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफचे संस्थापक इम्रान खान यांच्या तुरुंगातील कथित मृत्यूच्या चर्चेने पाकिस्तानच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. पाकिस्तानी पत्रकार वजाहत सईद खान यांनी केलेल्या एका दाव्यानंतर इम्रान खान यांच्या प्रकृती आणि सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, इम्रान खान यांच्या मृत्यूच्या माहितीला कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

पाकिस्तानी पत्रकार वजाहत सईद खान यांनी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर दावा केला की, तीन वरिष्ठ लष्करी सूत्रांनी त्यांना इम्रान खान आता जिवंत नसण्याची शक्यता असल्याचे सांगितले आहे. मात्र, या सूत्रांनी स्वतः इम्रान खान यांना मृत पाहिलेले नाही. इम्रान खान यांच्या



प्रकृतीबाबत चिंता वाढण्यामागे त्यांचे कुटुंबीय, पक्षाचे नेते, वकील आणि खासगी डॉक्टरांना त्यांची भेट घेण्यासंदभार्तील सातत्याने सुरू असलेले वादही कारणीभूत आहेत. पक्षाने यापूर्वीही इम्रान खान यांना एकाकी ठेवले जात असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या उपचारांबाबतही पक्षाकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. जून महिन्यात पक्षाने इम्रान खान यांना रुग्णालयात दाखल करण्याची, त्यांच्या नियमित भेटीची परवानगी देण्याची आणि खासगी डॉक्टरांकडून त्यांची तपासणी करण्याची मागणी केली होती. मे महिन्यातही इम्रान खान यांच्या बहिणींना तसेच खैबर पख्तूनख्वाचे मुख्यमंत्री सोहेल अफरीदी यांना अदियाला तुरुंगात जाण्यापासून रोखण्यात आले होते. या घटनेविरोधात पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफने आंदोलनही केले होते. इम्रान खान यांच्या स्थितीबाबत वाढत असलेली चिंता आता राजकीय संघषार्चे रूप घेत आहे. पक्षाचे नेते आणि खैबर पख्तूनख्वाचे मुख्यमंत्री सोहेल अफरीदी यांनी पक्षाचे २० लाखांहून अधिक कार्यकर्ते रस्त्यावर उतरण्यास तयार असल्याचा दावा केला आहे.

पक्षाने २७ सप्टेंबर रोजी इस्लामाबादपर्यंत लाँग मार्च काढण्याची घोषणाही केली आहे. त्यामुळे इम्रान खान यांच्या प्रकृतीबाबतच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. इम्रान खान ऑगस्ट २०२३ पासून तुरुंगात असून, त्यांच्यावर अनेक प्रकरणांमध्ये शिक्षा सुनावण्यात आली आहे.

# सर्पदंशामुळे ३ मुलींचा मृत्यू, माजी खासदार आणि पुत्रासह पाच जणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील अनुदानित आश्रमशाळेत १० ऑगस्ट रोजी घडलेल्या भीषण सर्पदंश प्रकरणी अखेर मोठी कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या घटनेत तीन चिमुकल्या विद्यार्थिनींचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी संस्थेचे अध्यक्ष आणि माजी खासदार मारोतराव कोवासे, संस्था सचिव आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विश्वजीत कोवासे यांच्यासह शाळेच्या पाच जणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी १२ ऑगस्ट रोजी जपतलाई आश्रमशाळेला भेट देऊन पाहणी केल्यानंतर या







कारवाईची अधिकृत माहिती दिली.धानोरा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यामध्ये खालील ५ जणांचा समावेश आहे.

यात मारोतराव कोवासे (माजी खासदार व संस्था अध्यक्ष), विश्वजीत कोवासे (जिल्हा काँग्रेस अध्यक्ष व संस्था सचिव), प्रशांत ताटपल्लीवार (शाळेचे मुख्याध्यापक), भाष्कर भोयर (वसतिगृह अधीक्षक), भाग्यश्री चिल्लमवार (महिला वसतिगृह अधीक्षिका) यांचा समावेश आहे.

सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ. प्रभू सादमवार यांच्या फियार्दीवरून चार सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालानंतर १२ ऑगस्टच्या पहाटे ही धडक कारवाई करण्यात आली. या प्रकरणात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह बाल न्याय अधिनियमांतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत विद्यार्थिनींमध्ये दीपिका लकडा (इयत्ता ६ वी), सुष्मिता मंडल (इयत्ता ८ वी), अनु कोरेटी (इयत्ता २ री) यांचा समावेश आहे. तर दीपिका मदवी (इयत्ता ५ वी), कविता किरंगा (इयत्ता ६ वी) आणि समृद्धी नैताम (इयत्ता ८ वी) यांच्यावर गडचिरोली जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी समृद्धी नैताम हिची प्रकृती चिंताजनक आहे.

आश्रमशाळेतील प्रशासकीय निष्काळजीपणामुळेच तीन निष्पाप विद्यार्थिनींचा जीव गेल्याचा प्राथमिक निष्कर्ष समितीने काढला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून दोषी कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना त्वरित निलंबित करण्यात येईल, असे आश्वासन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिले आहे.

# सातबारावर नाव नसलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा

- सर्व शेतकऱ्यांना रेकॉर्डवर आणण्याचे महसूलमंत्री यांचे आदेश
- राज्यातील २.३१ लाख शेतकऱ्यांच्या 'ॲग्रीस्टॅक'चा मार्ग होणार मोकळा
- सर्वांना कर्जमाफी आणि शासकीय योजनांचा मिळणार लाभ
- जिल्हाधिकाऱ्यांना १५ दिवसांत अहवाल सादर करण्याची सूचना

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्यातील ज्या शेतकऱ्यांची नावे सातबारा उताऱ्यावर नाहीत किंवा इतर अधिकारात ज्यांच्या नावांची नोंद नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना रेकॉर्डवर आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

या निर्णयामुळे राज्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचा 'ॲग्रीस्टॅक' मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असून, त्यांना कर्जमाफी आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार आहे. यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.

मंत्रालयात महसूल मंत्र्यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला मत्स्योद्योग मंत्री नितेश राणे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार निलेश राणे आणि आमदार दीपक केसरकर, महसूल व सहकार व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यामध्ये सध्या तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचे 'ॲग्रीस्टॅक' निघत नसल्याची गंभीर बाब समोर आली होती. यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी होत्या. राज्यात सुमारे ५० हजार शेतकरी मयत आहेत, ज्यांच्या नोंदी अद्ययावत नाहीत.१० हजार प्रकरणांमध्ये जमीन वडिलांच्या नावे असून, मुलाचे नाव अद्याप सातबारावर लागलेले नाही. शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या 'कबुलायतदार' जागांवर सरकारचे नाव लावण्यात आले आहे. परिणामी, अशा शेतकऱ्यांना पीककर्ज मिळत नाही आणि घेतलेल्या कजार्ला कर्जमाफीचा लाभही मिळत नाही. एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात १,२०७ शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' अद्याप निघालेले नाहीत. तर राज्यातील ही संख्या २ लाख ३१ हजार आहे.

या सर्व अडचणींची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने पावले उचलली आहेत. "जे शेतकरी आहेत, परंतु त्यांचे नाव सातबारा किंवा इतर अधिकारात नाही, अशा शेतकऱ्यांच्या जमिनीची सर्व कागदपत्रे गोळा करून सहकार विभागाकडे पाठविण्यात येतील. यासाठी एक स्वतंत्र फॉरमॅट तयार करून सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून १५ दिवसांत अहवाल मागविण्यात





यावा," असे निर्देश त्यांनी दिले आहेत. लवकरच जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन याबाबतचे अंतिम आदेश निर्गमित केले जातील.

### देवस्थान, इनाम आणि वतन जमिनींसाठी विशेष उपाययोजना

ज्या शेतकऱ्यांकडे देवस्थान, कबुलायतदार, इनाम किंवा वतन जमिनी आहेत, त्यांनाही सर्व शासकीय सुविधा मिळाव्यात या उद्देशाने एक विशेष फॉर्म तयार करण्यात येणार आहे. यामुळे भविष्यात या शेतकऱ्यांनाही 'ॲग्रीस्टॅक' काढण्यासाठी मोठी मदत होणार आहे. सहकार आयुक्तांनी स्पष्ट केले आहे की, पात्र शेतकऱ्यांची यादी लावण्यात आली असून, ज्यांचे ॲग्रीस्टॅक निघू शकत नाही, त्यांच्याकडून इतर पर्यायी कागदपत्रे घेऊन मार्ग काढण्यात येईल.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले की, "राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा अचूक डेटा तयार करून सर्वांना अधिकृत रेकॉर्डवर आणले जाईल. जे खऱ्या अर्थाने शेतकरी आहेत, मात्र तांत्रिक अडचणींमुळे त्यांना कर्जमाफी मिळालेली नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर विशेष प्रयत्न केले जातील."

# बोलेरोला स्विफ्ट कारची जोरदार धडक; १२ जखमी, ६ गंभीर

## देवदर्शनाहून परतणाऱ्या भाविकांच्या कारचा अपघात

**वृत्तसंस्था, जळगाव**

राज्यातील रस्ते अपघाताच्या घटना काही केल्या कमी होताना दिसून येत नाहीत. दररोज कुठे ना कुठे अपघात झाल्याची बातमी माध्यमांत पाहायला मिळते. आता, जळगाव जिल्ह्याच्या पाचोरा तालुक्यातील आंबेवडगाव येथील देवदर्शन करून परतणाऱ्या भाविकांच्या बोलेरो पिकअप वाहनाला पाचोराकडून जाणाऱ्या स्विफ्ट कारने जोरदार धडक दिल्याची घटना ११ ऑगस्ट रोजी मध्यरात्री घडली. या अपघातात एकूण १२ भाविक जखमी झाले असून, त्यापैकी सहा जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. उर्वरित सहा जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. पाचोरा तालुक्यातील आंबेवडगाव येथील बंजारा समाजातील भाविक सिन्नर तालुक्यातील वडांगडी येथे गेले होते. तेथून परतताना पाचोरा ते भडगाव दरम्यान ही दुर्घटना घडली.

देवदर्शनाहून बोलेरो कारमधून भाविक गावी परतत असताना पाचोरा ते वडगाव रस्त्यावर



अपघाताची भीषण दुर्घटना घडली. या अपघातातील जखमींमध्ये संजय पवार (५०), अविनाश पवार (२४), सुनील राठोड (२७), सुपडुबाई ईश्वर पवार (४०), उज्ज्वलाबाई सुनील राठोड (२२) आणि मिराबाई सरिचंद राठोड (६०) यांचा समावेश आहे. एकूण १२ भाविक या वाहनातून प्रवास करत होते.

अपघातानंतर जखमींना तातडीने भडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथे डॉ. पंकज जाधव यांनी प्रथमोपचार केले, त्यानंतर पुढील उपचारासाठी सर्व जखमींना पाचोरा येथील विघ्नहर्ता हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

शहरातील खासगी हॉस्पिटलमध्ये डॉ. सागर गरुड यांनी जखमींवर उपचार केले. दरम्यान, काँग्रेस तालुकाध्यक्ष सचिन सोमवंशी यांनी देखील रुग्णालयात भेट देऊन जखमींची विचारपूस केली, तसेच त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. अपघातातील जखमींवर सध्या उपचार सुरू असून, अपघात नेमका कसा घडला याबाबत पुढील तपास सुरू आहे.

संपादकीय लेखणीतून...

# उत्पादन खर्चाचा तडका, दूधाचा भडका!

वाढत्या उत्पादन खर्चाचा मोठा फटका आता थेट सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार आहे. दूध विक्री दरामध्ये प्रति लिटर २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या सभासदांच्या बैठकीत शनिवारी घेण्यात आला. केवळ दूधच नाही, तर बाजारातील विविध दुग्धजन्य पदार्थांच्या दरामध्येही १० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले. ही नवीन दरवाढ ११ ऑगस्ट (मंगळवार)पासून लागू झाली. त्यामुळे ग्राहकांना आता दुधासाठी अधिकचे पैसे मोजावे लागणार आहेत. पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे (कात्रज डेअरी) अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत दूध व्यवसायावर पडत असलेल्या वाढत्या आर्थिक बोजाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. डिझेलच्या दरात प्रतिलिटर सुमारे १० रुपयांची झालेली वाढ, साखरेच्या दरात प्रतिकिलो १२ रुपयांची झालेली वाढ आणि पॅकिंगच्या एकूण खर्चात झालेली ३० टक्क्यांहून अधिक वाढ यामुळे दुग्ध व्यवसायाची प्रक्रिया आणि वाहतूक खर्च कमालीचा वाढल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

याशिवाय, अलिकडे दूध खरेदी दरात झालेली वाढ आणि आगामी काळात दूध खरेदी दरामध्ये आणखी वाढ होण्याची दाट शक्यता लक्षात घेऊनच अखेर हा दरवाढीचा निर्णय घ्यावा लागल्याचे दूध संघांकडून सांगण्यात आले. सहकारी आणि खासगी दूध संघांचे सुमारे २० प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. डिझेल, साखर आणि पॅकिंग साहित्याच्या दरवाढीमुळे ओढवलेल्या या संकटामुळे दूध संघांना हा दरवाढीचा निर्णय घेणे भाग पडले असून, याचा थेट परिणाम आता गृहिणींच्या बजेटवर होणार आहे. गोकुळने म्हैस दूध खरेदी दरात प्रतिलिटर दीड रुपये तर गाय दूध खरेदी दरात एक रुपया दरवाढ केली आहे. ही दरवाढ मंगळवार (११ ऑगस्ट) पासून लागू झाली. म्हैस दूध विक्री दरात प्रतिलिटर दोन रुपये वाढ केली आहे. गायीच्या दूध विक्रीदरात वाढ केलेली नाही. गोकुळ संलग्न ७५०० दूध संस्थांच्या माध्यमातून दररोज १४ ते १५ लाख लिटर दूध संकलन केले जाते. यंदा पावसाळा लांबला असून अनेक ठिकाणी कमी-जास्त प्रमाणात पाऊस सुरू आहे. यामुळे ओल्या चाऱ्याची कमतरता निर्माण झाली आणि त्याचा परिणाम दूध उत्पादनावर झाला. याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत असल्याने दूध खरेदी दरात वाढ करण्याचा निर्णय गोकुळने घेतला. विक्री दरातील वाढ ही कोल्हापूरसह पुणे, मुंबईसाठीही लागू असणार आहे. दूध खरेदी दरात यापूर्वीच वाढ झाली आहे. पुढील काळात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे खरेदी प्रक्रिया, वेष्टन आणि वाहतूक दरात झालेल्या दरवाढीचा विचार करून दूध विक्री दरात प्रतिलिटर २ रुपये आणि दुग्धजन्य पदार्थांच्या दरात १० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गणेशोत्सव ऐन तोंडावर आलेला असताना साखरेच्या दरात मोठी वाढ झाली आहे. गेल्या महिन्यात साखरेची सरासरी किंमत ४७.१७ रु. प्रति किलो होती, ती आता वाढून ५०.३० रु. झाली आहे. गत वर्षाच्या तुलनेत साखरेच्या दरात सुमारे ९ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. गत काही दिवसांपासून महागाई ठराविक अंतराने वाढताना दिसत आहे. कधी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होते, तर कधी भाजीपाला महाग होतो. कधी घरगुती वापराचे तेल महागते तर कधी एलपीजीच्या किमती वाढताना दिसतात. संघटनेने दुग्धजन्य पदार्थांच्या दरात १० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये विविध दुग्धजन्य पदार्थांचा समावेश असू शकतो. दुधाच्या दरवाढीचा थेट परिणाम सर्वसामान्य कुटुंबांच्या, विशेषतः जे दररोज मोठ्या प्रमाणात दूध खरेदी करतात, त्यांच्या घरगुती बजेटवर होऊ शकतो. इतकेच नाही तर, दुधाच्या दरवाढीमुळे दही, चीज आणि इतर दुग्धजन्य पदार्थांच्या दरातही वाढ होऊ शकते. यापूर्वी मे महिन्यात अमूल, मदर डेअरी, सुधा आणि जयपूर डेअरी यांनीही देशभरात दुधाच्या दरात वाढ केली होती. त्यावेळी कंपन्यांनी सांगितले होते की, त्यांना वाढत्या खचार्चा सामना करावा लागत असल्याने ही दरवाढ आवश्यक झाली आहे. दरवाढ पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीनंतर झाली आहे. कारण इराण-अमेरिका युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक विस्कळीत झाली असून पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. इराण-अमेरिका युद्ध अद्याप संपलेले नाही.

होर्मुझ सामुद्रधुनी करारासंदर्भात ओमान आणि इराण यांच्यात चर्चा सुरू आहे. जर होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये जलवाहतूक पुन्हा सुरू झाली, तर तेलाच्या किमती कमी होऊ शकतात. दुधाच्या नव्या दरवाढीमुळे गायीच्या दुधाचा दर ६२ रुपये आणि म्हशीच्या दुधाचा दर ७८ रुपये प्रतिलिटर झाला आहे. यापूर्वी गायीचे दूध ६० रुपये आणि म्हशीचे दूध ७६ रुपये प्रतिलिटर दराने विकले जात होते. दरम्यान, दुधासाठी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) लागू करण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे केंद्र सरकारने गेल्या महिन्यात संसदेत स्पष्ट केले होते.

# आश्रमशाळांची दुरावस्था ?
## राज्यातील सर्वच शाळांच्या ऑडिटची गरज

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

महाराष्ट्रात आदिवासी विकास विभागांतर्गत सध्या सुमारे ४९७ ते ४९९ शासकीय आश्रमशाळा आणि ५५४ ते ५५६ अनुदानित (अशासकीय/ संस्थाचालक) आश्रमशाळा कार्यरत आहेत.

राज्यात या दोन्ही प्रकारच्या एकूण १,०५५ आश्रमशाळा सुरू असून, त्यामध्ये सुमारे ४ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत. शासकीय आश्रमशाळा थेट शासनामार्फत चालवल्या जातात, तर अशासकीय (अनुदानित) आश्रमशाळा विविध स्वयंसेवी संस्थांद्वारे चालवल्या जातात व त्यांना शासन अनुदान पुरवते.मात्र या आश्रम शाळांमध्ये अनेक सोयी सुविधांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अतिशय गंभीर बनला आहे महाराष्ट्रातील दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सुरू करण्यात आलेल्या आश्रमशाळांमध्ये मूलभूत सुविधांचा प्रचंड अभाव ही एक गंभीर आणि चिंताजनक समस्या बनली आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही अनेक ठिकाणी विद्यार्थी अजूनही अत्यंत बिकट परिस्थितीत शिक्षण आणि निवास करत आहेत. आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी या शाळा सुरू करण्यात आल्या, परंतु सद्यस्थितीत अनेक शाळांमध्ये अत्यंत दलालाची आणि बिकट परिस्थिती पाहायला मिळते.

राज्यातील सर्वच आश्रमशाळांचे ऑडिट (तपासणी) करणे ही सद्यस्थितीतील एक अत्यंत महत्त्वाची आणि गंभीर गरज आहे. आदिवासी आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन झालेल्या या शाळांमध्ये अनेकदा पायाभूत सुविधांचा अभाव, सुरक्षेचे प्रश्न आणि आर्थिक गैरव्यवहार समोर येत असतात. राज्य सरकारने केवळ कागदोपत्री ऑडिट न करता, शिक्षण तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि शासकीय अधिकारी यांची संयुक्त समिती नेमून प्रत्येक आश्रमशाळेची प्रत्यक्ष पाहणी करावी, तरच या शाळांचा दर्जा सुधारू शकेल.

अनेक आश्रमशाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याचा अभाव आणि अस्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांना आजारांना सामोरे जावे लागते. अनेक आश्रमशाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याचा अभाव आणि अस्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण होतो. दूषित पाणी आणि अस्वच्छ वातावरणामुळे मुलांमध्ये गॅस्ट्रो, टायफॉईड, उलट्या-जुलाब आणि मलेरिया यांसारखे संसर्गजन्य आजार वेगाने पसरतात. या समस्येवर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. नुकत्याच घडलेल्या हणेगाव (नांदेड) आणि मेळघाट (अमरावती) येथील घटनांमध्ये अशुद्ध पाणी व निकृष्ट भोजनामुळे अनेक विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे समोर आले आहे.

अनेक दुर्गम भागातील आश्रमशाळांमध्ये विहिरी किंवा बोअरवेलच्या असुरक्षित पाण्याचा वापर केला जातो. या पाण्याचे नियमित शुद्धीकरण किंवा क्लोरिनेशन केले जात नाही. काही शाळांमध्ये वॉटर फिल्टर मशीन बसवल्या आहेत, पण देखभालीअभावी त्या बंद अवस्थेत पडून असतात.पुरेशा पाण्याअभावी आणि नियमित स्वच्छतेअभावी शौचालये अत्यंत दुर्गंधीयुक्त आणि अस्वच्छ राहतात. यामुळे जंतूंचा संसर्ग वेगाने पसरतो.पिण्याच्या पाण्याच्या टाक्या अनेक महिने स्वच्छ न केल्यामुळे त्यात गाळ, कचरा आणि जंतू तयार होतात. दूषित पाणी पाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर परिणाम होतो. सतत आजारी पडल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये कुपोषण आणि शारीरिक अशक्तपणा वाढतो. आजारपणामुळे विद्यार्थी अनेक दिवस वर्गात गैरहजर राहतात, ज्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होते.

विद्यार्थिनींवर परिणाम विशेषतः किशोरवयीन विद्यार्थिनींना मासिक पाळीच्या काळात स्वच्छतेच्या साधनां अभावी आणि अस्वच्छतेमुळे शाळा सोडून घरी जावे लागते.

**सुरक्षेचा प्रश्न:** शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न खरोखरच अत्यंत गंभीर बनला असून, गडचिरोलीतील जपतलाई आश्रमशाळेत मण्यार सापाच्या दंशाने ३ विद्यार्थिनींचा झालेला मृत्यू हे याचे ताजे व धक्कादायक उदाहरण आहे. या दुर्दैवी घटनेनंतर राज्य शासनाने संबंधित आश्रमशाळेची मान्यता कायमची रद्द केली असून, राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचे सर्वंकष सोशल ऑडिट व कडक तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. सीसीटीव्ही आणि सुरक्षारक्षक आहेत की नाही, याचे ऑडिट होणे गरजेचे आहे. राज्यातील सर्व निवासी वसतिगृहांचे सामाजिक सर्वेक्षण आणि सुरक्षा ऑडिट करणे गरजेचे आहे.

**महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती:** विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी २४ तास महिला अधीक्षिका हजर असणे बंधनकारक करावे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थाचालक आणि संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून तात्काळ निलंबन केले पाहिजे.

आश्रम शाळांमध्ये वैद्यकीय तपासणीचा अभाव ही महाराष्ट्रातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित एक अत्यंत गंभीर समस्या आहे. शासकीय नियमांनुसार आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करणे बंधनकारक असतानाही, प्रशासकीय उदासीनता आणि अपुऱ्या सुविधांमुळे या नियमांची योग्य अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र वारंवार समोर येते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येत असून कुपोषण, विषबाधा आणि वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या घटना घडत आहेत. वेळेवर प्रथमोपचार किंवा वैद्यकीय तपासणी न मिळाल्याने सर्पदंश, तीव्र ताप किंवा विषबाधेमुळे विद्यार्थ्यांचा मृत्यू होण्याच्या दुर्दैवी घटना घडतात. विद्यार्थ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी आणि प्रथमोपचार साधनांची उपलब्धता तपासणे आवश्यक आहे.

शासनाने प्रत्येक आश्रमशाळेत दर महिन्याला किमान एक वेळेस विशेष वैद्यकीय पथकामार्फत अनिवार्य तपासणी करावी. प्रत्येक विद्यार्थ्याची नोंद असणारे 'शालेय आरोग्य कार्ड' अद्ययावत ठेवून त्याचा नियमित फॉलोअप घेतला पाहिजे. शाळांमध्ये सर्पदंश प्रतिबंधक लस आणि इतर आवश्यक आपत्कालीन औषधांचा साठा कायम उपलब्ध असावा. दूषित अन्न आणि पाण्याच्या तपासणीसाठी नियमित ऑडिट व्हावे, जेणेकरून अन्नातून होणारी विषबाधा रोखता येईल.'अटल आरोग्य वाहिनी' सारख्या तंत्रज्ञानावर आधारित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून तज्ज्ञ डॉक्टरांशी टेलि-कन्सल्टेशनद्वारे संपर्क वाढवावा.

**पायाभूत सुविधांची दुरवस्था इमारतींची स्थिती:** अनेक आश्रमशाळा पत्र्याच्या शेडमध्ये किंवा मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये भरतात.

अनेक आश्रमशाळांच्या इमारती जुन्या आणि मोडकळीस आलेल्या आहेत. पावसाळ्यात गळती होणे आणि भिंतींना तडे जाणे यांसारख्या समस्यांमुळे मुले धास्तीत असतात. पक्के बांधकाम नसल्यामुळे पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरावा लागतात. उन्हाळ्यात प्रचंड उष्णता आणि पावसाळ्यात पाण्याचा त्रास विद्यार्थ्यांना सहन करावा लागतो. वर्गखोल्या अपुऱ्या पडतात. वीज, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि व्हेंटिलेशन यांसारख्या मूलभूत सुविधांचा तीव्र अभाव असतो. मोडकळीस आलेल्या इमारतींमुळे कधीही दुर्घटना घडण्याची भीती असते. गैरसोयींमुळे विद्यार्थ्यांच्या एकाग्रतेवर आणि शिक्षणावर वाईट परिणाम होतो.अयोग्य वातावरणामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. धोकादायक इमारतींची त्वरित दुरुस्ती करणे गरजेचे आहे. पत्र्याचे शेड काढून तिथे आधुनिक आणि सुरक्षित वर्गखोल्या बांधावे. सर्व आश्रमशाळांमध्ये पिण्याचे पाणी, वीज आणि स्वच्छतेच्या योग्य सुविधा तातडीने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**निवासाची सोय:** विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी पुरेशी जागा, गाद्या आणि हिवाळ्यात ब्लँकेट्स मिळतात की नाही, याची पाहणी होणे गरजेचे आहे.

मुला-मुलींसाठी पुरेशी आणि स्वच्छ शौचालये व न्हाणीघरे असणे अनिवार्य आहे.

### अन्नाचा दर्जा आणि पोषण आहाराचा दर्जा

विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमांनुसार पौष्टिक आणि दर्जेदार जेवण मिळते की नाही, हे तपासणे गरजेचे आहे. अनेकदा निकृष्ट दजार्चे धान्य पुरवले जाते, ज्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या पोषणावर होतो. शासनाकडून प्रति विद्यार्थी मिळणाऱ्या अनुदानाचा वापर खरोखरच विद्यार्थ्यांवर होतो की त्यात भ्रष्टाचार होतो, याचे कडक आर्थिक ऑडिट हवे. शाळेत मंजूर पदे किती आणि प्रत्यक्ष कार्यरत शिक्षक किती आहेत, तसेच ते विद्यार्थ्यांना योग्य दर्जाचे शिक्षण देतात का, याचे देखील तपासणी होणे आवश्यक आहे. अचानक आणि निष्पक्षपणे केलेल्या ऑडिटमुळे व्यवस्थापनावर वचक बसेल. ऑडिटमध्ये त्रुटी आढळल्यास किंवा निधीचा अपहार झाल्यास संबंधित संस्थाचालक आणि अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे.

- ९५६१५९४३०६

# आमचे ते जेन झी...झारखंडचे ?



झाडाझडती
विनोद देशमुख, नागपूर

नीट परीक्षा पेपरफूट, त्यानंतर काक्रोच जनता पार्टीचं आंदोलन आणि त्यावरून सुरू असलेलं राजकारण यातून समूह माध्यमांना दररोज भरपूर मसाला मिळत आहे. नाटकांचा जागतिक महाविक्रम करणारे रंगकर्मी प्रशांत दामले या विनोदवीरानंही यात आपलं 'योगदान' दिलं, असं आता म्हणावं लागेल. इन्स्टाग्राम वरून शांततेचं आवाहन आणि एबीपी माझा वाहिनीवरील एका कार्यक्रमात त्यांनी केलेली काही विधानं वादग्रस्त ठरली. विशेषतः "नीटचा फुलफॉर्म जर आपल्याला माहीत नसेल तर घोषणा देऊन उपयोग काय?" या त्यांच्या अभिप्रायावरून गदारोळ झाला नसता तरच नवल. त्यावरून दामलेंना समूह माध्यमांवर खूप ट्रोल केलं गेलं. जेन झीचे समर्थक म्हणवणाऱ्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. सध्या ट्रोलिंगची अन् पत्रकारितेचीही भाषा कशी असते, हे वेगळं सांगण्याची गरज नाही.

जेन झी या विषयासंदर्भात दामले म्हणाले "ही तरुणाई उत्साही, वेगवान असते. परंतु त्यातील २० टक्केच लोक अभ्यास करून, माहिती करून घेऊन कोणत्याही गोष्टीला प्रतिसाद देत असतात. ८० टक्के तरुण हा अर्धवट माहितीच्या आधारेच पुढे जात असतो." पुढे नीटबद्दल बोलताना फुलफॉर्म हा शब्द उच्चारला गेला अन् वादाला विषय मिळाला. जेन झीचं ताजं आंदोलन नीटचं असल्यामुळे हा मुद्दा ओघानं आला, हे येथे लक्षात घेतलं पाहिजे. त्याआधी हेच दामले जेन झी बद्दल दामले असं म्हणाले "तरुणांच्या म्हणण्याला योग्य वेळी उत्तर देणं अतिशय महत्त्वाचं आहे.

त्यांना समजून घेऊन लवकरात लवकर निर्णय घ्यायला पाहिजे." हे वाक्य कोणत्या अर्थानं जेन झी च्या विरोधात किंवा केन्द्रातील सत्ताधाऱ्यांच्या बाजूचं आहे? उलट, जेन झीची बाजू घेणारं आहे. परंतु, ही गोष्ट बाजूला पडून फुलफॉर्मवरून रान पेटलं. अर्थात, दामलेंनी तरुणाईचं टक्केवारीत केलेलं विश्लेषण सर्वांना मान्य होईलच असं नाही. कोणाला ती टक्केवारी ३०-७० किंवा ४०-६० अशीही वाटू शकते किंवा बहुसंख्य आंदोलक हे समजून उमजूनच आले होते, असाही दावा केला जाऊ शकतो. प्रत्यक्षात मात्र तसं दिसलं नाही. या आंदोलनात सहभागी झालेल्या लोकांनी दिलेल्या घोषणा, त्यांची भाषा, त्यांचं वागणं हे सारं आलबेल होतं का? बहुसंख्य आंदोलकांना नीटची नीट माहिती होती किंवा त्यांना तेवढाच प्रश्न हाती घ्यायचा होता, असं जाणवत नव्हतं म्हणणारेही खूप आहेत. "कहीपे निगाहे, कहीपे निशाना" स्टाईलनं हे आंदोलन झालं. काही विशिष्ट, सरकारविरोधी राजकीय पक्षांचा पाठिंबा त्यात स्पष्टपणे दिसत होता. म्हणूनच मग प्रतिट्रोलिंगही मोठ्या प्रमाणावर झालं. (आता "आमचंच तेवढं खरं होतं, तुमचं मात्र विकतचं" असं कोणीच कोणाला म्हणू नये, ही आज समूह माध्यमांची स्थिती झालेली आहे, हे कोणालाही नाकारता येणार नाही.)

एकूणच जेन झी आंदोलनासंबंधीची काही लोकांची दुटप्पी भूमिका झारखंड प्रकरणानं उघड्यावर आणली, हे नाकारता येत नाही. तेही आंदोलन जेन झीचंच आहे. परंतु, दिल्लीच्या वेळी केन्द्र सरकारला सतत धारेवर धरणारे सीजेपी आणि इंडी आघाडीचे त्यांचे सहकारी पक्ष झारखंडबद्दल पूर्ण उदासीन दिसतात. कारण, ते सरकार काँग्रेसचं आहे. त्यांना अडचणीत आणलं तर ते भाजपाच्या फायद्याचं ठरेल, इतकं साधं राजकीय गणित यासंदर्भात काम करीत आहे. यातील प्रस्थापित राजकीय पक्षांची पक्षपाती भूमिका आपण एकवेळ समजू शकतो. कारण, ते आपण पाहतच आलो आहोत. पण, सीजेपीचं काय? त्यांनी तरी जेन झी च्या दोन आंदोलनांमध्ये असा भेदभाव करायला नको, असं तरुणाईला वाटलं तर त्यांना दोष देता येईल का? त्यात झारखंड हे वंचितांचं राज्य आहे. त्यांच्या संदर्भात सुद्धा राजकारणच वरचढ ठरणार असेल तर मग कसली तरुणाई, कसलं संविधान अन् कसलं काय! सारंच गौडबंगाल !! दामले किंवा अन्य व्यक्तींवर आगपाखड केल्यानं हा पक्षपात थोडीच झाकला जाणार आहे?

- ज्येष्ठ पत्रकार

# २०२७ चे रणशिंग फुकले! वनडे वर्ल्डकपचे गणित, गणिताचे कोडे अन् कॅरिबियन क्रिकेटची शोकांतिका

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

कसोटीचा अभिजातपणा आणि टी-२० च्या झंझावातातही ज्याचा करिष्मा आजही अबाधित आहे, त्या आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२७ चे रणशिंग आतापासूनच फुंकले गेले आहे. आफ्रिकेच्या वैविध्यपूर्ण भूमीवर दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबियाच्या संयुक्त यजमानपदाखाली हा १४ देशांचा महासंग्राम रंगणार आहे. एका बाजूला बलाढ्य संघांची थेट प्रवेशासाठी चाललेली पळापळ आणि दुसऱ्या बाजूला एकेकाळच्या महासत्ता असलेल्या कॅरिबियन क्रिकेटचे अधांतरी टांगलेले भवितव्य, असा रोमहर्षक आणि तितकाच नाट्यमय थरार सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट जगतात पाहायला मिळत आहे.

### १४ संघांचे भव्य मैदानः कोणाला मिळणार थेट प्रवेशाची लॉटरी?

२०२३ च्या १० संघांच्या मर्यादित प्रयोगानंतर आयसीसीने पुन्हा एकदा १४ संघांच्या जुन्या आणि रंजक फॉरमॅटला पसंती दिली आहे. या १४ जागांसाठी सध्या पडद्यामागे गणितांचे मोठे कोडे मांडले जात आहे.

यजमानांचा राजमार्ग : - दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे यांना यजमान देश म्हणून स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला आहे. मात्र, नामिबियाला सह-यजमानपद मिळूनही थेट प्रवेशाची लॉटरी लागलेली नाही; त्यांना जागतिक पात्रतेचा खडतर मार्गच चोखाळावा लागणार आहे.

रँकिंगचा कट-ऑफ ड्रामाः - ३१ मार्च २०२७ या कट-ऑफ तारखेला आयसीसी एकदिवसीय क्रमवारीतील (यजमानांना वगळून) अव्वल ८ संघ थेट पात्र ठरतील. सध्याच्या घडीला भारत, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान, श्रीलंका, अफगाणिस्तान आणि बांगलादेश या संघांनी आपली दावेदारी मजबूत ठेवली आहे.

पात्रता फेरीचा थरारः उर्वरित ४ मोकळ्या जागांसाठी जगातील नामांकित एसोसिएट देश आणि रँकिंगमध्ये मागे पडलेले संघ 'आयसीसी वर्ल्डकप क्वालिफायर'च्या मैदानात उतरतील, जिथे थेट 'आर या पार'ची लढाई रंगेल.

विंडीजचे भाग्य अधांतरीः सर व्हिव्हियन रिचर्ड्सच्या भूमीवर 'अश्रूंचे ढग' १९७५ आणि १९७९ चे पहिले दोन विश्वचषक जिंकून संपूर्ण जगावर आपल्या वेगवान गोलंदाजीची आणि धडाकेबाज फलंदाजीची हुकुमत गाजवणारा वेस्ट इंडि .ज (विंडीज) संघ आज अस्तित्वाच्या लढाईत अत्यंत हतबल दिसत आहे. २०२३ च्या भारत विश्वचषकात इतिहासात पहिल्यांदाच विंडीजचा संघ अनुपस्थित होता. आता २०२७ च्या महाकुंभातही त्यांची तीच शोकांतिका पुनरावृत्त होण्याच्या उंबरठ्यावर उभी आहे.

कॅरिबियन क्रिकेटच्या या दयनीय अवस्थेला अनेक महत्त्वाची कारणे कारणीभूत आहेत. सध्या आयसीसीच्या एकदिवसीय क्रमवारीत विंडीज संघ १० व्या ते ११ व्या स्थानाच्या आसपास हेलकावे खात आहे, ज्यामुळे त्यांना थेट प्रवेश मिळणे अत्यंत कठीण झाले आहे. याशिवाय, खेळाडूंचे राष्ट्रीय कर्तव्यापेक्षा आयपीएल किंवा सीपीएलसारख्या जगभरातील टी-२० फ्रँचायझी लीगला मिळणारे प्राधान्य, विंडीज क्रिकेट बोडार्शी खेळाडूंचे सातत्याने होणारे कराराचे वाद, आणि कामगिरीतील टोकाची अनिश्चितता यामुळे हा संघ गर्तेत फेकला गेला आहे.

### पॅशन' विरुद्ध 'पैसा': कॅरिबियन क्रिकेटची अंतर्गत उलथापालथ

कॅरिबियन बेट्सवर गुणवत्तेची कधीच कमतरता नव्हती. मायकेल होल्डिंगचा तो ताशी १५० किमीचा वेग असो किंवा खिस गेलचे षटकारांचे वादळ! पण आजचा कॅरिबियन क्रिकेटपटू देशाच्या जसीपेंक्षा विविध टी-२० फ्रँचायझींच्या जसीर्ला जास्त पसंती देताना दिसतो. एकदिवसीय मालिकेसाठी मिळणाऱ्या मानधनापेक्षा दोन महिन्यांच्या टी-२० लीगमध्ये खेळाडूंना अफाट पैसा आणि प्रसिद्धी मिळते, ज्यामुळे अनेक नामांकित खेळाडू ५० षटकांच्या फॉरमॅटमधून अंग काढून घेतात.

२०२३ च्या पात्रता फेरीत नेदरलँड्स आणि झिम्बाब्वेसारख्या दुबळ्या वाटणाऱ्या संघांनी विंडीजला धूळ चारली होती. २०२७ च्या क्वालिफायर फेऱ्या याहून अधिक खडतर असणार आहेत. जर ३१ मार्च २०२७ पूर्वी विंडीजने मालिकांवर मालिका जिंकून आपली रँकिंग सुधारली नाही, तर पुन्हा एकदा क्वालिफायरच्या दलदलीत त्यांचा गळा घोटला जाण्याची दाट शक्यता आहे.

### कॅरिबियन स्वाभिमानाची अंतिम कसोटी

२०२७ च्या विश्वचषकात १४ संघ समाविष्ट झाल्यामुळे इतर नवख्या देशांना मोठी संधी मिळाली आहे, पण वेस्ट इंडिजसाठी हा प्रवास अत्यंत काटेरी बनला आहे. कॅरिबियन ताफा या महाकुंभात आपले पुनरागमन करून जुना स्वाभिमान मिळवून देतो, की विंडीज क्रिकेटचे सुवर्णयुग केवळ इतिहासाच्या पानांवरच जमा राहाते, हा सध्याचा क्रीडा जगतातील सर्वात मोठा आणि उत्कंठावर्धक प्रश्न बनला आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# मनपाच्या विद्यार्थ्यांकडून आज 'वंदे मातरम्'चा गजर

## हर घर तिरंगा अंतर्गत शहरात विविध कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
हर घर तिरंगा या मोहिमेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरात विविध कार्यक्रम आयोजित केले जात आहे. या अंतर्गत उद्या गुरूवार (ता. १३) मनपा शाळेतील विद्यार्थी महाल भागातील चिटणीस पार्कवर सकाळी ८ वाजता राष्ट्रगान वंदे मातरम्चा सामुहिक स्वरात गजर करणार आहेत.

या कार्यक्रमांना महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, विरोधी पक्षनेता संजय महाकाळकर, आयुक्त डॉ. विपीन, शिक्षण विशेष समितीच्या सभापती संतोषदेवी लद्धा उपस्थित राहणार आहेत.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र शासनाच्या 'हर घर तिरंगा' या अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून माननीय महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात देशभक्तीपर आधारित विविध सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे



आयोजन केले जात आहे, लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढवणे, ही सदर उपक्रम राबविण्यामागील मूळ कल्पना आहे.

याच मालिकेत पुढील तीन दिवस विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. गुरूवार दिनांक १३ ऑगस्टला सकाळी ८ वाजता चिटणवीस पार्क, महाल येथे महानगर पालिकेच्या सर्व विद्यालयातील विद्यार्थ्यांचे वंदे मातरम् गायनाचे आयोजन करण्यात आले आहे. भारताचे राष्ट्रीयगीत वंदे मातरम्‌ला १५० वर्ष पूर्ण झाले असून, स्वातंत्र्यपूर्व काळात स्वदेशी चळवळीत 'वंदे मातरम' च्या माध्यमातून राष्ट्रीय एकतेचा संदेश देण्यात आला होता, याच अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकतेची भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

येत्या १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसात वाजता दयानंद पार्क समोर, जरीपटका येथे फाळणी भयावहता स्मृतीदिनाच्या अनुषंगाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, १९४७ ला झालेल्या देशाच्या फाळणीमुळे अनेक भारतीयांसोबत झालेल्या अमानवीय यातना, हिंसा आजही प्रत्येक भारतीय नागरिकांमध्ये भय आणि दुःखद भावना निर्माण करते, नागरिकांमध्ये फाळणी समयी झालेल्या संघर्षाची जागरूकता या माध्यमातून निर्माण होईल.

स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

थोडक्यात

## राजमाता जिजाऊ पतसंस्थेकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर**
मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार माध्यमिक विद्यालय श्रीरामपूर येथे राजमाता जिजाऊ नागरी पतसंस्था श्रीरामपूरतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश धर्माळे तर प्रमुख अतिथी पतसंस्थेचे मार्गदर्शक प्रा. महादेव गावंडे, व्यवस्थापक प्रशांत वानखेडे उपस्थित होते. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शैक्षणीक साहित्य वाटप करण्यात आले मुख्याध्यापक गणेश धर्माळे यांनी मनुष्य जन्मात सहकार्य वृत्ती आवश्यक असून जिजाऊ पतसंस्थेने मागील वर्षी सुद्धा सर्व शालेय विद्यार्थ्यांना टिफीन बॅगचे वाटप केले होते शिवाय अनेक शैक्षणिक,सामाजिक उपक्रम राबविले जातात असे सांगून पतसंस्थेच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

कार्यक्रम प्रसंगी वरिष्ठ लिपीक वाढे,वसुली अधिकारी सुयोग राऊत, अल्पबचत प्रतिनिधी बोरकर, रोखपाल मीनल दुधाने,लिपीक आशा ठाकरे व बेले सेविका कविता पोले,छाया वानखेडे सुनीता चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन बाळकृष्ण मंदाडे तर आभारप्रदर्शन विनोद पडघणे यांनी केले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकेत्तर कर्मचारी सदानंद खिल्लारे, अनिल अस्वार, विष्णू मंदाडे यांनी परिश्रम घेतले.

## विद्यासागर कला महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती व ग्रंथपाल दिवस



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
स्थानिक विद्यासागर कला महाविद्यालयामध्ये दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाअंतर्गत डॉ.एस. आर. रंगनाथन जयंती व राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अर्थशास्त्र विभागाचे डॉ. विलास जयभाये म्हणुन उपस्थित होते. डॉ. विलास जायभाये यांनी आपल्या वक्तव्यामध्ये आज विद्यार्थ्यांना " वाचन हे किती महत्त्वाचे आहे व या अफाट ज्ञानसागरात तसेच स्पर्धात्मक युगामध्ये जर आपल्याला टिकायचे असेल तर आज या पाठ्यपुस्तकांसोबत स्पर्धात्मक पुस्तकांचा देखील अभ्यास करणे खूप आवश्यक आहे. तसेच जर तुम्ही आज जेवढं वाचन कराल तेवढा तुमच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये सुधारणा होईल व एक तुम्ही सुंदर व्यक्तित्व म्हणून समाजात नावलौकिक होईल" असे विचार व्यक्त केले.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शनातून प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या रोजच्या वेळापत्रकात किमान १० पाने तरी वाचली पाहिजे. या वाचनाने प्रत्येकाचा दृष्टिकोन विकसित होईल, असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजन महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रमुख डॉ. आशिष ठाणेकर यांनी केले. त्यांनी डॉ.एस.आर. रंगनाथन यांचा जीवनप्रवास उलगडवून दाखविला. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन युगांती दुधपचारे हिने मानले. कार्यक्रमाला बी.ए. भाग एक, दोन व तीनचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुस्कान ठाकूर हिने केले. याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. गिरीश सपाटे, डॉ.सावन धर्मपुरीवार, डॉ.ज्योती कवठे, डॉ. रवींद्र पानतावणे, प्रा. गंगा मोंढे, प्रा. रणजीत वायसे, ग्रंथालय परिचर युनिस पठाण प्रामुख्याने उपस्थित होते.

## मनोज जरांगे पाटील यांच्यावर सक्त कारवाईची मागणी

### भाजपा नेते आनंदराव राऊत यांचे पोलिस अधीक्षकांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी - मिलिंद गाडेकर**
मराठा आरक्षण मुद्द्यावरून अख्खा महाराष्ट्रात चचेर्ला आलेले मनोज जरांगे पाटील यांनी सोशल मीडियावर, तसेच न्यूज चॅनेल ला दिलेल्या मुलाखतीत महाराष्ट्रशासन मधील महत्त्वपूर्ण महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांना टार्गेट करून दररोजच अश्लील , शिवीगाळ, वयक्तिक रित्या अडतदा बोलले जात आहे, त्यामुळे त्यांची प्रतिमा मलिन होत आहे. त्यांच्या आक्षेपार्ह आणि विक्षिप्त विधानाबद्दल आज जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत यांनी पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांना काल निवेदनातून सक्त कारवाहीची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आनंदराव राऊत यांनी पुढे निवेदनात नमूद केले की,एस मनोज जरांगे यांचे सहकारी त्रिशूल पाटील यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल करून त्यात अतिशय घाणेरडी भाषा वापरली आहे. त्यामुळे हा आक्षेपार्ह व्हिडिओ तत्काळ हटवण्यात यावा त्यांच्यामुळे सामाजिक वातावरण दूषित होत आहे समाजात तेढ निर्माण करणारे हे वक्तव्य आहे., सोशल मीडियावरिल पोस्ट, व्हिडिओ, आणि आक्षेपार्य कमेंट्सची तपासणी करण्यात यावी आणि संबंधितावर कारवाही भारतीय संविधानाला अधीन राहून करावी. यावेळी जिल्ह्याचे उपाध्यक्ष अनिल निधान, कामठी शहराचे नेते लालु यादव, भाजप युवा जिल्हाध्यक्ष चेतन खडसे, जिल्ह्याचे उपाध्यक्ष, राजेश रंगारी, माजी जिल्हाध्यक्ष नरेश मोठघरे, रिंकेश चवरे, आस्तिक पाटील शहारे कुही, यांचेसह भाजपा गणमान्य मान्यवरांची उपस्थिती होती.

## नशामुक्त युवा – सशक्त भारत, उमरेडमध्ये युवा दिनानिमित्त मार्गदर्शन कार्यशाळा

### युवकांनी व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी पुढाकार घ्यावा : विद्या खोब्रागडे



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त रणधीरसिंह भदोरीया महाविद्यालय, उमरेड येथे राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभाग, रेड रिबीन क्लब आणि ग्रामीण रुग्णालय, उमरेड यांच्या संयुक्त विद्यमाने नशामुक्त भारत अभियान अंतर्गत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित विद्यार्थ्यांना नशामुक्त भारत अभियानाची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शिका तथा ग्रामीण रुग्णालय, उमरेड येथील एड्स समुपदेशक विद्या खोब्रागडे यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे महत्त्व आणि नशामुक्त भारत अभियानाची गरज याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यसन हे केवळ एका व्यक्तीचे जीवन उद्ध्वस्त करत नाही, तर त्याचा संपूर्ण कुटुंब आणि समाजावर विपरीत परिणाम होतो. तरुण पिढी व्यसनाच्या आहारी गेल्यास देशाचे भविष्य अंधकारमय होऊ शकते. त्यामुळे नशामुक्त भारत अभियान यशस्वी करण्यासाठी युवकांनी एकत्र येऊन समाजात जनजागृती करणे आवश्यक आहे, असे विद्या खोब्रागडे यांनी सांगितले.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम, व्यसनापासून दूर राहण्याचे उपाय तसेच व्यसनमुक्त समाजनिर्मितीत युवकांची भूमिका याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सामाजिक समस्या समजून घेऊन जनजागृतीच्या माध्यमातून समाजाला व्यसनमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रमोद मेश्राम यांनी केले. सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेविका कु. श्रेया बेलखुडे हिने केले, तर आभार कु. साक्षी नांदरधाने हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री तिवारी, प्रा. सुरेखा जुनघरे, प्रा. राहुल भुसारी (रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी), प्रा. नितेश गेडाम, प्रा. कमल भिसीकर, प्रा. काजल ढोले, राजेश खोपे, नरेश कोरे, लक्ष्मण फटिंग, रजत वैद्य, अमित चिंचालकर, चंदा मराठे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी आणि रासेयो स्वयंसेवकांनी सहकार्य केले. 'नशामुक्त युवा - सशक्त भारत' या संदेशातून विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संकल्प केला.

## बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात 'रंगनाथन डे' साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा येथे दिनांक- १२ ऑगस्ट , २०२६ रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून 'रंगनाथन डे' ग्रंथपाल दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ.संगीता चोरे यांनी केले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर. जी. टाले होते. रंगनाथन दिनाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी ग्रंथालयाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले व महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पुस्तकांचे भव्य प्रदर्शन करण्यात आले. या प्रदर्शनीमध्ये भारताचे संविधान, विश्वकोश, शब्दकोश, संतसाहित्य, ग्रामीण, दलित, आदिवासी साहित्य ठेवण्यात आले होते, तसेच स्पर्धा



परीक्षांची पुस्तके सुद्धा त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली, विद्यार्थ्यांनी त्या पुस्तकांची मनसोक्त पाहणी केली व त्या पुस्तकांकडे विद्यार्थी आकर्षित झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. संगीता चोरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाविषयी माहिती दिली. ही माहिती देताना पुस्तके जीवनाचा सार आहे. मुद्रित पुस्तकातून आज ई-बुक कडे परिवर्तित झाले व ई - बुक मुळे विद्यार्थी आज बरीचशी माहिती उपलब्ध करू शकतात. विद्यार्थी घडवा व सविस्तर माहिती जगविख्यात माहिती त्याला मिळावी यासाठीच डॉ. रंगनाथन यांनी पाच लॉ सांगितले व त्या पाच लॉ चे पालन करूनच आज विद्यार्थी घडविण्यात सक्षमतेने समृद्ध अशी ग्रंथालये निर्माण झाली आहेत. अशी माहिती त्यांनी दिली.

अध्यक्षीय भाषणातून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. टाले म्हणाले की ,विद्यार्थी उत्तम घडविण्यासाठी विद्यापीठाने सुद्धा अतिरिक्त कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. नुकताच प्राचार्य फोरमच्या मीटिंगमध्ये झालेल्या निर्णयानुसार नशा मुक्ती या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या मार्गदर्शनातून विद्यार्थी नशा मुक्त होईल.व त्याचे भवितव्य ठरेल असे त्यांनी सांगितले.हल्ली विद्यार्थी शिक्षणापासून भरकटतो आहे नियमितपणे महाविद्यालयात येऊन शिक्षण घेईल याकरिता आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत आमचा विद्यार्थी घडावा व महाविद्यालयांमध्ये त्यांनी आपले भविष्य घडवावे अशी आशा व्यक्त करतो असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचाल डॉ. संगीता उमाळे यांनी केले व आभार प्रा. जया फाये यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.गजानन सोमकुवर, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. धनराज शेट्टे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.प्रतिभा गढवे. डॉ वर्षा बोपचे, प्रा. योगिता मानमोडे,प्रा. सोनम गवळी, प्रा शिल्पा घाटोळे, प्रा. आकांक्षा गोरले , प्रा.अर्षद खान ,प्रा.सुरेखा बोरकर व समस्त प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला ग्रंथालय परिचर अरविंद भड व अरुण सिंदुरकर यांचे सहकार्य लाभले.

## नवरगाव परिसरात मोहफुलाच्या दारू भट्टीवर पोलिसांची धाड

### २,०३,५००, रुपयाचा मुद्देमाल जप्त, आरोपी लक्ष्मण मदन गुर्वे फरार

**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**
तुमसर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या नवरगाव येथे मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, तुमसर पोलिसाकडून मोहफुल दारू भट्टीवर धाड टाकली असता, आरोपी नाव लक्ष्मण मदन गुर्वे, अंदाजे वय ४३ वर्षे, रा. नवरगाव, ता. तुमसर, जि. भंडारा या प्रकरणात नमूद आरोपी मौजा नवरगाव शिवारात पोलिसांना पाहून पळून गेला.
आरोपी उभा असलेल्या



ठिकाणी पंचासमक्ष पाहणी केली असता, ४० प्लॅस्टिकच्या पॉलीथिनमध्ये प्रत्येकी २५ कि.ग्रॅ. सडवा मोहाफूल/ मोहापास प्रमाणे एकूण १००० कि.ग्रॅ. सडवा मोहापास प्रत्येकी २००/- रुपये कि.ग्रॅ. प्रमाणे एकूण किं. २,००,०००/- रुपयांचा माल; तसेच घटनास्थळावर अंदाजे ०७ मण जळाऊ लाकूड अंदाजे किं. २,१००/- रु. व २ लोखंडी जुने ड्रम अंदाजे किं. १,४००/- रु. असा एकूण २,०३,५००/- रुपयांचा मुद्देमाल अवैधरीत्या आढळून आल्याने कायम अप. क्र. ९०३/२०२६ कलम ६५ (फ) म. दा. का. (महाराष्ट्र दारूबंदी कायदा) अन्वये सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी विसापुरे, सुभाष बारसे साहेब पोलिस निरीक्षक तुमसर, पो. नि. आघाव यांच्या मार्गदर्शनात पो. सिपाही रंभाड, बिसने पो. स्टे. तुमसर यांनी केली असून, पुढील तपास पोलीस स्टेशन तुमसरचे अधिकारी करीत आहेत.

# सायबर जनजागृती कार्यशाळेत २४६ विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षेचे प्रशिक्षण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर - मिलिंद गाडेकर**
नंदनवन, नागपूर येथील श्रीमती जानकीदेवी जैस्वाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवारी सायबर हायजीन आणि सायबर एथिक्स या विषयावर सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात २४६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. हा कार्यक्रम एडुसन फाउंडेशन यांच्या वतीने आणि सायबर सेल, नागपूर पोलीस यांच्या सहकार्याने आयोजित




करण्यात आला होता. सायबर सेल, नागपूर पोलीसचे तन्मय रायसने हे कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रायसने यांनी सायबर हायजीन, तंत्रज्ञानाचा नैतिक वापर तसेच सायबर फसवणुकीच्या विविध प्रकारांबाबत माहिती दिली. गेमिंग अॅप्स, टास्कच्या नावाखाली होणारी फसवणूक, संशयास्पद अढङ फाइल्स तसेच सध्या चर्चेत असलेल्या डिजिटल अरेस्ट या फसवणुकीच्या प्रकाराबाबत त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागरूक केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरेही दिली.

निलेश काळे यांनी सोशल मीडियाच्या अतिवापराचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक विकासावर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी शिक्षण व कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करावे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच चांगले चारित्र्य, सायबर बुलिंग आणि सोशल मीडियावरील जबाबदार वर्तनाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तांदळे गुरुजी रिसोर्स अँड डेव्हलपमेंट सोसायटीचे अध्यक्ष दिलीप एम. तांदळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्यासंदर्भात त्यांनी आपले अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्यक्रमाला मुख्याध्यापिका संध्या जैस्वाल, उपमुख्याध्यापक विनोद काळे, विजय, निलेश काळे आणि दिलीप एम. तांडले यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शाळेचे वरिष्ठ शिक्षक व कार्यक्रम समन्वयक उमेश ठाकरे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी तसेच विद्यार्थ्यांची शिस्तबद्ध उपस्थिती व व्यवस्थापनासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय करून दिला. विनोद काळे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी सायबर हायजीन आणि सायबर एथिक्सचे पालन करण्याची शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून डिजिटल तंत्रज्ञानाचा सुरक्षित, जबाबदार आणि योग्य वापर करण्याचा संकल्प व्यक्त केला.

थोडक्यात

## शिवसैनिक राजाभाऊ रामदवार स्थानीक लोकअधिकार समितीच्या नागपूर समन्वयकपदी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्थानीक लोकअधिकार समितीच्या नागपूर वर्धा जिल्हा समन्वयकपदी नियुक्तीबद्दल अभिनंदन व पुढील वाटचाली करिता शुभेच्छा देण्यात आल्या.



रविभवन नागपूर येथील सभागृहात स्थानीय लोकाधिकार सेनेची स्थापना पूर्व सभा महासंघ मुंबईचे सरचिटणीस अरुण मोरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. सदर सभेमध्ये राजाभाऊ रामद्वार यांची वर्धा व नागपूर जिल्ह्याकरीता समन्वयक पदी नियुक्ती करण्यात आली. या सभेला शिवसेनेचे नागपूर लोकसभा जिल्हाप्रमुख व नगरसेवक सुरज गोजे, अजयभाऊ दलाल, रविनिशजी पांडे (चिंटू महाराज) व लोकाधिकार सेनेचे सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी शिवसैनिक विशाल कोरके यांनी त्यांचे स्वागत केले.

## तरोडी येथे गरजू विद्यार्थ्यांसाठी शिक्षकाचा माणुसकीचा हात; स्वखर्चातून बूट वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

गट ग्रामपंचायत तुमान अंतर्गत मौजा तरोडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकडे बूट नसल्याचे निदर्शनास आल्याने शाळेतील शिक्षक अभिषेक रंगारी यांनी सामाजिक बांधिलकी जपत बूट नसलेल्या गरजू विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या खचार्तून बूट खरेदी केले. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण घेताना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने शिक्षक अभिषेक रंगारी यांनी स्वखचार्तून बूट उपलब्ध करून दिले. या बुटांचे विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत तुमानचे सरपंच धम्मजीत गजभिये व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभिषेक गायकवाड यांच्या हस्ते सोमवार ( ता. १० ऑगस्ट) ला वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला. शिक्षकांनी केलेल्या या उपक्रमाचे पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने कौतुक करण्यात आले.शिक्षक अभिषेक रंगारी यांच्या या उपक्रमातून शिक्षक केवळ शिकवत नाही, तर विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार त्यांच्यासाठी उभाही राहतो, हा मानवतेचा संदेश मिळाला आहे.

## श्री खाटू श्याम मंदिरात भजन संध्या व महाप्रसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

द्वादशीनिमित्त उत्तर भारतीय सभेच्या वतीने लावा येथील श्री राधा मोहन खाटू श्याम मंदिरात भजन संध्या व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन उत्तर भारतीय सभेचे नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष विजय मिश्रा, विभागीय अध्यक्ष प्रवीण सिंग व मंदिर समिती प्रमुख रोशन मोहन हिरणवार यांनी केले. यावेळी विदर्भ अध्यक्ष डी. बी. सिंग, नागपूर जिल्हाध्यक्ष रामप्रताप शुक्ला व महिला प्रमुख मनीषा जयस्वाल यांच्या नेतृत्वात पूजा व आरती करण्यात आली. उत्तर भारतीय सभेतर्फे गेल्या पाच वर्षांपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात शारदा भजन मंडळ व गायिका पूनम शर्मा यांनी खाटू श्याम बाबांच्या स्तुतीपर मधुर भजने सादर केली. भजनसंध्येला भाविकांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या समारोपानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राकेश सिंग, विवेक पांडे, अमरीश दुबे, ओ. पी. तिवारी, राम सखा, हर्ष सिंग, मनोज सिंग, रामसिंग, राकेश त्रिपाठी, वीरेंद्र चौधरी, विजय शुक्ला, विष्णू दुबे, संजय भगत, यश अंबरे, दिव्यम पटले, दयाशंकर व अन्य कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

## ज्येष्ठ पत्रकार वसंत राव यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



द इंडियन एक्स्प्रेसच्या नागपूर आवृत्तीचे माजी उपसंपादक (डेप्युटी न्यूज एडिटर) वसंत राव यांचे मुंबई येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. वसंत राव यांनी नागपूरच्या द इंडियन एक्स्प्रेसच्या टीममध्ये कार्य करण्यापूर्वी मुंबई आणि चंदीगड आवृत्त्यांमध्येही पत्रकारिता केली होती. आपल्या प्रदीर्घ पत्रकारितेच्या कारकिर्दीत त्यांनी विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. त्यांच्या पश्चात पत्नी तसेच मोठा आप्त व मित्रपरिवार आहे.

## मौदा येथे आज भव्य तिरंगा यात्रा रॅली

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

संपूर्ण देशात ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान सुरू असून, तिरंगा हातात, देश प्रेम हृदयात असे म्हणत सर्व देशभक्त नागरिक या अभियानात सहभागी होत आहेत. याच अभियानाअंतर्गत उद्या गुरुवार (ता. १३ ऑगस्ट)ला मौदा येथे सकाळी १० वाजता भव्य तिरंगा यात्रा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रॅली ची सुरुवात तुकडोजी महाराज चौक ते शिवाजी महाराज चौक ते जयस्तंभ चौक असा असून तेली समाज भवन येथे रॅलीच्या समारोप होणार आहे. सर्व देशभक्त नागरिकांनी या रॅलीत सहभागी होण्याचे आव्हान कार्यक्रमाचे आयोजक कामठी मौदा विधानसभा क्षेत्रातील भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, मौदा मंडळ प्रभारी तथा तालुका समन्वय समिती अध्यक्ष नरेश मोटधरे, भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रामटेक ग्रामीण वीरेंद्र पायतोडे यांनी सोशल मीडियावर विविध ग्रुप वर पोस्ट टाकून केली आहे.

# विशेष ग्रामसभेत अवैध धंदे व एमडी तस्करीचा मुद्दा गाजला!

**खापरखेडा गँगवार प्रकरण, दोषी पोलिसांसह गुन्हेगारांवर कठोर कारवाईसाठी चार ग्रामपंचायती आक्रमक, विशेष ग्रामसभेत शेकडो नागरिकांची उपस्थिती**



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**

स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीत पोलिसांच्या आशीर्वादाने मोठ्या प्रमाणात अवैध धंदे, अमली पदार्थांची विक्री व एमडी तस्करीत वाढ झाली आहे. यासंदर्भात चार ग्रामपंचायत परिसरातील नागरिक आक्रमक झाले आहेत. अवैध धंदे व अमली पदार्थ विक्री आणि एमडी तस्करी कायमस्वरूपी बंद करण्याच्या दृष्टीकोनातून भानेगाव, चिचोली (खापरखेडा), पोटा चनकापूर व रोहना ग्रामपंचायतींच्या वतीने १२ ऑगस्ट बुधवारला आयोजित विशेष ग्रामसभेत मुद्दा प्रचंड गाजला.

यावेळी गुन्हेगारांसोबत दोषी पोलिसांवर कठोर कारवाई करण्याच्या ठराव मंजूर करण्यात आला. मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्ट रोजी एमडी तस्करी व सूडभावनेतून दगडी चाळ टोळीने गँगवॉर घडवून आणले होते. सदर घटनेमुळे संपूर्ण खापरखेडा परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्याना पोलीस जबाबदार आहेत. पोलीसा मुळेच गुन्हेगारांचे मनोबल उंचवल्याचा संताप ग्रामस्थांनी ग्रामसभेत व्यक्त केला.

खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत दिवसेंदिवस गुन्हेगारीचा ग्राफ सातत्याने वाढतो आहे. शिवाय अवैध धंदे फोफावत आहेत त्यामूळे अवैध धंदे, अमली पदार्थ विक्री आणि एमडी तस्करी कायमस्वरूपी बंद करण्याच्या दृष्टीकोनातून चारही ग्रामपंचायतींच्या विशेष ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आले. शिवाय दोषी पोलीस व गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मंजूर करण्यात आलेले ठराव नागपूर शहर पोलीस आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना दिले जाणार आहेत. निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, पालकमंत्री, स्थानिक आमदार, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना देण्यात येणार आहे.

विशेष ग्रामसभेला चारही गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, स्थानिक राजकीय व सामाजिक नेते, व्यापारी तसेच महिला व नागरिक शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.

## दगडी चाळ गँगवार प्रकरणात चेतन पटमासे यांचे पोलिसांसमोर आत्मसमर्पण

**दोन दिवसांची पोलीस कोठडी, चार आरोपींची तुरुंगात रवानगी**

दगडी चाळ गँगवार प्रकरणात चेतन पटमासे वय ४० रा वार्ड क्रमांक ३ रेल्वे चौकी खापरखेडा याने मध्यरात्री दरम्यान शहर गुन्हे शाखा पोलिसासमोर एका नातेवाईकाच्या मध्यस्तीने आत्मसमर्पण केले आरोपी चेतन पटमासे याला १२ ऑगस्ट बुधवारला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे दगडी चाळ गँगवार प्रकारणात आरोपीची संख्या अकरा झाली आहे.

### चार आरोपींची तुरुंगात रवानगी

दगडी चाळ गँगवार प्रकरणात शहर गुन्हे शाखा पोलिसानी हेमंत उर्फ सुदामा मधुकर चापाडहाके, शांतनू उर्फ दद्दु राजेंद्र बागडे, जितू रामचंद्र कनोजिया यांना ७ ऑगस्टला ताब्यात घेतले होते तर कामठी पोलिसानी समीर उर्फ बोंमट्या शेख याला ताब्यात घेतले होते खापरखेडा पोलिसानी सर्व आरोपीना अटक करून न्यायालयातून पाच दिवसाची पोलीस कोठडी मिळवली होती पोलीस कोठडी १२ ऑगस्ट रोजी संपली न्यायालयात आरोपींना हजर केले असता त्यांची तुरुंगात रवानगी करण्यात आली.

### तुरुंगातून प्रोडक्शन वारंटवर आणले तीन आरोपी

दगडी चाळ गँगवार प्रकरणातील मोहन ठाकूर खुरावत, प्रियांशु विद्याधर रक्षित, युगांत राजेश सारवे याची तुरुंगात रवानगी करण्यात आली होती मात्र तपासकामी तिन्ही आरोपींची पोलीसांना आवश्यकता होती ११ फेब्रुवारीला तुरुंगातून प्रोडक्शन वारंटवर तिन्ही आरोपीना आणण्यात आले न्यायालयात सादर केले असता १३ ऑगस्टपर्यंत दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे.

## महावितरणची तत्परता; सार्वजनिक बांधकाम विभागाने क्षतीग्रस्त केलेल्या भूमिगत वाहिनी दुरुस्तीचे काम उद्या

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहरातील विकास कामांना गती देतानाच ग्राहकांना अखंडित आणि सुरळीत वीज सेवा मिळावी, यासाठी महावितरण नेहमीच कटिबद्ध आहे. याच उत्तरदायित्वाची जपणूक करत, सार्वजनिक बांधकाम विभागातर्फत तुळशीबाग येथे सुरू असलेल्या रस्ता बांधकामाच्या कामादरम्यान ३३/११ केव्ही मॉडेल मिल उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या ११ केव्ही दक्षिणामूर्ती आणि ११ केव्ही महाल-१ या भूमिगत वाहिन्या क्षतीग्रस्त झाल्या आहेत. महावितरणने तत्परता दाखवित या वाहिन्या दुरुस्तीचे काम गुरुवार दि. १३ ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्रात करण्याचे नियोजन केले आहे.

या क्षतीग्रस्त वाहिन्यांमुळे भविष्यात कोणतीही मोठी तांत्रिक अडचण येऊ नये आणि ग्राहकांना अखंड वीज पुरवठा लाभावा, यासाठी या वाहिन्यांची तातडीने व अत्यंत सुरक्षितपणे दुरुस्ती करण्याचे महत्त्वपूर्ण काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी, गुरुवार, १३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत या वाहिनीवरील वीज पुरवठा तात्पुरता थांबविण्यात येणार आहे. या कामांमुळे दक्षिणामूर्ती चौक, महाल बडकस चौक, कुंभारपुरा परिसर, गजानन मंदिर परिसर, गांधी पुतला, आयचीत मंदिर चौक, दरोडकर चौक परिसर, झेंडा चौक गणेशपेठ, कर्नल बाग, जोग गल्ली, दसरा रोड, महाल, कोठी रोड, उपाध्याय रोड, गाडीखाना आणि लकडापूल या परिसरातील वीज पुरवठा बंद राहील.

## ओव्हरलोड वाळू वाहतूक करणाऱ्यांना एलसीबीचा दणका

**भिवापूरात सात टिप्परवर कारवाई**

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भिवापूरमार्गे सुरू असलेल्या ओव्हरलोड वाळू वाहतुकीवर नागपूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मध्यरात्री धडक कारवाई करत सात टिप्पर जप्त केले. मंगळवारी मध्यरात्री शहरातील पोलीस स्टेशन टी-पॉईंटवर नाकाबंदी करून ही कारवाई करण्यात आली. रॉयल्टीपेक्षा अधिक वाळू वाहून नेणाऱ्या टिप्परवर झालेल्या कारवाईने वाळू वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहेत.

गडचिरोली, चंद्रपूर आणि भंडारा जिल्ह्यांतील विविध वाळूघाटांतून वाळू भरून ती भिवापूरमार्गे उमरेड, बुटीबोरी, नागपूर, वर्धा, हिंगणघाट आणि अमरावतीकडे नेली जात असल्याचे चित्र आहे. हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू असतानाही यंत्रणांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मंगळवारी रात्री एलसीबीच्या पथकाने टी-पॉईंटवर नाकाबंदी केली. यावेळी रॉयल्टीत नमूद क्षमतेपेक्षा अधिक वाळू वाहून नेणारे सात टिप्पर पकडण्यात आले. पुढील कारवाईसाठी ही वाहने भिवापूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत.

**वाळू घाट ठेकेदारांविरुद्ध कारवाई करा!**

ओव्हरलोड वाळू वाहतूक करणारे टिप्पर रस्त्यावरून सर्रास धावत असतील, तर त्यांना संरक्षण कुणाचे? कारवाई होईपर्यंत हा काळा धंदा सुरूच कसा राहतो? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. भिवापूरमार्गे सुरू असलेल्या वाळू वाहतुकीला आशीर्वाद नेमका कुणाचा, याचा शोध घेणे गरजेचे आहे. शिवाय टिप्पर सोबतच रॉयल्टी पेक्षा अधिक वाळू वाहणात भरणाऱ्या वाळू घाटाच्या ठेकेदारांवर सुद्धा पोलिसांकडून कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

यावेळी एमएच-४०-सीटी-८४०१, एमएच-४०-बीएल-७२३७, एमएच-४०-बीएल-४३११, एमएच-४०-सीटी-९७९०, एमएच-४९-सीआर-९२८४, एमएच-४०-डीसी-९७९०, एमएच-३३- टी - २३३३ यांच्यावर कारवाई करण्शात आली.

# एकल महिला धोरणात महिलांच्या मागण्यांचा समावेश करा!

**उमरेडचे आ. संजय मेश्राम यांची मागणी, मंत्री आदिती तटकरे यांचे तात्काळ बैठक घेण्याचे निर्देश**

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावित 'एकल महिला धोरणा'मध्ये एकल महिला आणि सामाजिक संघटनांच्या मागण्या, सूचना व हरकतींचा समावेश करावा, अशी मागणी उमरेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे प्रतोद संजय मेश्राम यांनी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे केली. मंत्रालयात झालेल्या बैठकीत आमदार मेश्राम यांनी नागपूरच्या नारी शक्ती संघटनेच्या प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनातील मागण्यांची माहिती मंत्र्यांना दिली.



धोरण अंतिम करण्यापूर्वी प्रत्यक्ष एकल महिलांशी आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या सामाजिक संघटनांशी चर्चा करावी, अशी भूमिका मेश्राम यांनी मांडली. आर्थिक स्वावलंबन, कौशल्य विकास, रोजगार, शासकीय योजनांमध्ये प्राधान्य, आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षा यांसारख्या मुद्द्यांचा धोरणात समावेश करण्याची मागणी करण्यात आली. धोरण हे प्रत्यक्ष लाभार्थी महिलांच्या अनुभवांवर आणि गरजांवर आधारित असले पाहिजे, अशी भूमिका आमदार मेश्राम यांनी मांडली.

दरम्यान, आमदार मेश्राम यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत मंत्री आदिती तटकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना नारी शक्ती संघटना व संबंधित सामाजिक संघटनांसोबत तात्काळ बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत.

एकल महिलांचा सामाजिक सन्मान, सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन आणि सर्वांगीण विकास सुनिश्चित करणारे प्रभावी व सर्वसमावेशक धोरण तयार करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

# आमदार अडबाले यांचे शिक्षकांप्रती कार्य प्रशंसनीय

## माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांचे प्रतिपादन, "सुधाकरपर्व" विशेषांक प्रकाशन सोहळा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**



आमदार सुधाकर अडबाले हे निवडून आल्यापासूनच जुनी पेंशन योजना, टप्पा अनुदान, आश्वासित प्रगती योजना, वेतन तसेच वरिष्ठ महाविद्यालय, आयटीआय, आश्रमशाळेतील प्रश्न सतत सभागृहात मांडत असतात. केवळ प्रश्नांची मांडणी न करता ते प्रत्यक्ष धोरणात्मक निर्णय होईपर्यंत पाठपुरावा करतात, हा त्यांचा कार्यरचनात्मक दृष्टिकोन शिक्षकांसाठी दिलासादायक ठरत आहे. गेल्या साडेतीन वर्षांच्या कार्यकाळातच त्यांनी शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावल्याने त्यांचे हे शिक्षकांप्रती कार्य प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांनी व्यक्त केले.

शिक्षकांच्या हक्कांसाठी लढणारे कणखर नेतृत्व, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या आजवरच्या विधिमंडळ कार्यकाळातील केलेल्या कार्याचा आढावा घेणारा "सुधाकरपर्व" विशेषांक (पुस्तक) प्रकाशन सोहळा मोठ्या थाटात सोमवारी पार पडला. याप्रसंगी सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

आमदार व्ही. यू. डायगव्हाणे पुढे म्हणाले की, शिक्षकांच्या हक्कासाठी लढणारे आणि शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असणारे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार सुधाकर अडबाले यांची ओळख अधिक दृढ झाली आहे. विधान परिषदेत आणि विविध प्रशासकीय स्तरावर शिक्षकांची बाजू भक्कमपणे मांडत त्यांनी अनेक समस्या मार्गी लावल्या आहेत.

अनेक लोकप्रतिनिधींकडे केलेल्या कामांचे प्रकाशन करायला काहीच नसते. मात्र, आमदार अडबाले यांनी गेल्या तीन वर्षांपासून दरवर्षी सभागृहातील कामांचा हिशोब "सुधाकरपर्व" या पुस्तकाच्या माध्यमातून देत आहेत, ही त्यांची जमेची बाजू असल्याचे दिलीप कडू यांनी सांगितले.

चंद्रपूर येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात आमदार सुधाकर अडबाले यांच्या वाढदिवसानिमित्त या पुस्तिकेचे प्रकाशन माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, सीमा अडबाले, महामंडळ उपाध्यक्ष जगदीश जुनगरी, लक्ष्मणराव धोबे, रोडे, श्याम धोपटे, विजय टोंगे, विमाशि संघाचे वर्धा जिल्हा कार्यवाह महेंद्र सालंकार, मारोतराव अतकरे, केशवराव ठाकरे, श्रीहरी शेंडे, विजय भोगेकर व अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रकाशन सोहळ्याचे संचालन विमाशि संघाचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी यांनी, प्रास्ताविक हितेश गोहोकार तर आभार जिल्हा कार्यवाह सुनील धोपटे यांनी मानले.

सोबतच वाढदिवसानिमित्त आमदार ॲड. अभिजीत वंजारी, आमदार देवराव भोंगळे, माजी आमदार ॲड. वामनराव चटप, सुदर्शन निमकर, ॲड. संजय धोटे, नगराध्यक्ष अल्का अनिल वाढई, नगराध्यक्ष निलेश ताजणे, चंद्रपूर उपमहापौर प्रशांत दानव, स्थायी समिती सभापती मनस्वी गिऱ्हे, शिवसेना जिल्हाध्यक्ष संदीप गिऱ्हे, काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष शिवा राव, काँग्रेस महिला जिल्हाध्यक्ष कुंदा जेनेकर, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र वैद्य, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार तसेच नगरसेवक, विविध राजकीय, शैक्षणिक, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विमाशि संघाचे प्रांतीय, जिल्हा, तालुका पदाधिकारी, सदस्य यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

थोडक्यात

## दहेगाव येथे वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव व गट ग्रामपंचायत दहेगाव च्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम दहेगाव येथे आज बुधवार (ता. १२ ऑगस्ट) ला घेण्यात आला. या कार्यक्रमाला मौदा पंचायत समिती चे गटविकास अधिकारी महेश बहेकर, मौदा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संकेत मरसकोल्हे, गट ग्रामपंचायत दहेगावचे सरपंच भारती संदीप आंबिलढुके, गट ग्रामपंचायत दहेगावचे उपसरपंच रवींद्र ढोमणे, शाळा व्यवस्थापन समिती दहेगावचे अध्यक्ष नितेश इंगळे, दहेगावातील प्रतिष्ठित नागरिक नथू आंबिलढुके, पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगावचे मुख्याध्यापक वासुदेव भुते, गट ग्रामपंचायतचे ग्रामसेवक राजकुमार गजभिये, इको क्लबचे प्रमुख राजेश रोहाड ,इको क्लबचे सर्व विद्यार्थी, सर्व गट ग्रामपंचायत दहेगाव येथील कर्मचारी, गट ग्रामपंचायत दहेगाव येथील मनरेगाची काम करणारे सर्व कर्मचारी उपस्थितीत होते.

सुरुवातीला गट ग्रामपंचायत दहेगावच्यावतीने दहेगाव ते चिखली या रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे लावण्यात आली. त्यानंतर पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगावच्या शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला शिक्षकवृंद सुधीर खंडाईत, सुधीर कांबळे, राजेश रोहाड, प्रज्ञा रामटेके, सुजाता बोदेले, संगीता कारेमोरे, पुष्पलता उके,उमेश उके, कैलास फटिंग उपस्थित होते. आभार प्रदर्शन शिक्षक राजेश रोहाड यांनी केले.

## हरित महाराष्ट्र अभियान अंतर्गत ३०० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

व्हीबी जी राम जी योजनेतून तालुका सावनेर येथील ग्रामपंचायत वेलतूर, गोसेवाडी, इसापूर, वाकीमध्ये डॉं. कैलास घोडके, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितित व मार्गदर्शनार्थ वृक्षारोपण करून कार्यक्रम यशस्वी रित्या संपन्न करण्यात आले. यावेळी वेलतूर ग्रामपंचायत चे सरपंच सुधाकरजी भोयर व ग्रामपंचायत अधिकारी गायकवाड यांनी व ग्राम रोजगार सेवक नंदू मोंढे यांनी जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांचे स्वागत करून विशेष आभार प्रगट केले. त्या सोबतच ग्रामपंचायत वेलतूर येथे लाभार्थीचे शेतात जाऊन गुलाब लागवड व ग्राम पंचायत गोसेवाडी, इसापूर, येथे विशेष भेट देऊन तेथील परिसरात माननीय सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. तसेंच शाळा व अंगणवाडी ला भेट देऊन विध्यार्थी सोबत संवाद साधण्यात आला. अंगणवाडी तिला बालकांना ग्रामपंचायत मार्फत गणवेश वाटप करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे वेळी तालुका सावनेरचे गट विकास अधिकारी मनोजकुमार हिरुडकर प्रामुख्याने उपस्थित होते. सोबतच पंचायत समिती सावनेर चे विस्तार अधिकारी उमाठे उपस्थित होते. व्हीबी जी राम जी सावनेरची संपूर्ण टीम विभाग प्रमुख तथा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी दिनेश सोमकुवर व शुभांगी नागदवणे यांचे सह तांत्रिक सहायक (कृषी) सूरज शेंडे व अजय चाफेकर उपस्थित राहून वृक्षारोपण व संगोपन बाबतीतील जबाबदारी हाताळत असल्याचे दिसून आले. तसेच पंचायत समिती कामठी अंतर्गत ७६ ग्रामपंचायतीमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वीरिते पार पाडण्यात आला.

## भाजपा संघटनात्मक आढावा बैठक संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांनी पक्षाची संघटनात्मक रचना अधिक सक्षम करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तळागाळापर्यंत प्रभावीपणे काम करण्याचे आवाहन केले. कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवून पक्षाची विचारधारा आणि केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर दिला. भारतीय जनता पार्टी नागपूर ग्रामीण (रामटेक) जिल्ह्याची संघटनात्मक आढावा बैठक उमरेड येथील पंडित दीनदयाल उपाध्याय सभागृहात संपन्न झाली. रविंद्रजी चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत पक्षाच्या संघटनात्मक बळकटीकरणासह आगामी काळातील पक्षकायार्बाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीस मंत्री संजय कुटे, जिल्हाध्यक्ष ग्रामीण आनंदराव राऊत, आमदार प्रवीणजी दटके, आमदार संजय भेंडे, आमदार डॉ. राजीव पोतदार,माजी आमदार सुधीर पारवे, सुधाकरजी कोहळे, अरविंद गजभिये, अनिल निधान, अजय बोढारे, राहुल किरपान, रिंकेश चवरे, शुभांगीताई गायधने, माजी आमदार टेकचंद सावरकर, माजी आमदार डी. मल्लिकार्जुनजी रेड्डी, माजी आमदार राजू पारवे, डॉ. शिरीष मेश्राम, शहर अध्यक्ष सतीश चौधरी, नगराध्यक्ष प्राजक्ताताई कारू, आस्तिकजी सहारे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंदरावजी राऊत यांनी केले. संचालन अनिल निधान यांनी केले, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# नवी मुंबईत साकारणार विदर्भ भवन

### चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बैठकीत निर्णय, प्रवीण दटकेंचा पाठपुरावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नवी मुंबई**

(खारघर - पनवेल) परिसरात विदर्भ भवन उभारण्यासाठी शासनातर्फे २ एकर जागा उपलब्ध करावी तसेच या प्रकल्पासाठी आवश्यकता भासल्यास उरफफंडिंग उपलब्ध करण्याच्या मागणीकरिता प्रवीण दटके यांच्याकडून हिवाळी अधिवेशन २०२६ दरम्यान मुख्यमंत्री तसेच चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला होता.

आज झालेल्या बैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी खारघर येथे उपलब्ध असणाऱ्या २ एकर जागेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी रायगड तसेच सिडकोचे एमडी यांना दिले आहेत, यावेळी आमदार प्रवीण दटके हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून तसेच आमदार विक्रांत पाटील आणि विदर्भ सेवा फाउंडेशनचे चित्तरंजन टेंभेकर उपस्थित होते.

त्यानुसार विदर्भ सेवा सहयोग फाउंडेशन या सामाजिक संस्थेमार्फत नवी मुंबई, खारघर व पनवेल परिसरात वास्तव्यास असलेल्या विदभार्तील नागरिकांसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्याबाबतही शासनाला सुचवण्यात आले होते.

या परिसरात विदभार्तील मोठ्या संख्येने कुटुंबे वास्तव्यास असल्यामुळे त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी तसेच विदर्भातून नवी मुंबईत येणाऱ्या नागरिकांना तात्पुरती सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विदर्भ भवन उभारणे अत्यंत आवश्यक आहे.

नवी मुंबई परिसरातील विदर्भ परिवारांना एकत्र येण्यासाठी तसेच विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी एक केंद्र उपलब्ध सकारात्मक दृष्टीने विचार करून आवश्यक ती कार्यवाही करावी, करण्याची मागणी करण्याची प्रवीण दटके यांनी केली. विदर्भ भवन च्या माध्यमातून विदर्भातील लोकांना मोठा फायदा होणार असल्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# अंबाझरी तलाव जलपर्णीच्या विळख्यातून मुक्ततेच्या मार्गावर

### महापौर निता ठाकरे यांचा पुढाकार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पर्यावरणासाठी घातक असलेल्या जलपर्णीच्या विळख्यातून अंबाझरी तलाव मुक्त करण्यात मनपाच्या घनकचरा विभागाला यश येत आहे. जलपर्णीतून अंबाझरी तलावासह शहरातील इतर तलाव मुक्त करण्याचा संकल्प महापौर निता ठाकरे यांनी केला आहे.



पर्यावरणासाठी घातक असलेल्या या जलपर्णी अंबाझरी तलावावर पसरली होती. शहरातील या ऐतिहासिक तलावाची जलपर्णीच्या विळखत्यातून मुक्तता करण्यासाठी महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित यांच्या नेतृत्वात मोहिमेला सुरूवात झाली होती.तसेच नगरसेवक योगेश पाचपोर यांच्यासह इतर नगरसेवकांनी देखीलया मोहिमेसाठी पाठपुरावा केला आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभागाने यासाठी विविध पातळ्यांवरून जलपर्णीचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. महापौर ठाकरे यांनी सातत्याने या मोहिमेचा पाठपुरावा केला. तसेच आयुक्त डॉ. विपीन यांनी जलपर्णीच्या निर्मूलनासाठी निधीची कमतरता कमी पडू देणार नाही. तसेच नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून जलपर्णी निर्मूलनाची मोहिम राबवावी, असे निर्देश प्रशासनाला दिले होते.

जलपर्णीला घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने शक्य नसल्याने मनपाने वीड हार्वेस्टरची मदत घेतली. वीड हार्वेस्टर तलावाच्या मध्यभागी असलेल्या जलपणीर्ला काठावर आणणे शक्य झाले. जवळपास तीन महिन्यांपासून ही मोहिम सातत्याने सुरू होती. उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्या मार्गदर्शनात घनकचरा व्यवस्थापन विभाग ही मोहीम यशस्वी करीत आहे. यामुळे संपूर्ण तलावात पसरलेल्या जलपणीर्चे निर्मूलन करणे शक्य होत आहे.

**जलपर्णीला समूळ नष्ट करू : महापौर**

पर्यावरणासाठी घातक असलेल्या जलपर्णीचे समूळ नष्ट करण्यासाठी मनपा प्रशासन कटिबद्ध असून घनकचरा व्यवस्थापन विभागाने केलेले हे काम प्रशंसनीय असल्याची प्रतिक्रिया महापौर निता ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. संपूर्ण अंबाझरी तलावावर जलपर्णीचे संकट आले होते. परंतु नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून हे यश मिळविले आहे, असेही ठाकरे यांनी म्हटले आहे.

## स्वप्नपूर्ती' प्रकल्पातील ५१८ ई डब्ल्यू एस सदनिकांसाठी महापौर निता ठाकरे यांच्याहस्ते आज सोडत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)- २.० अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या वतीने मौजा-नारी येथे उभारण्यात येत असलेल्या ५१८ ईडब्ल्यूएस सदनिकांच्या 'स्वप्नपूर्ती' प्रकल्पाची संगणकीय सोडत आज महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते आज ता.१३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृह येथे काढण्यात येणार आहे.



याप्रसंगी खासदार माया इवनाते, आमदार अभिजीत वंजारी, आमदार सुधाकर आडबाले, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार कृपाल तुमाने, आमदार संजय भेंडे, आमदार राजीव पोद्दार, आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार विकास ठाकरे, आमदार मोहन मते, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, विरोधी पक्ष नेता संजय महाकाळकर, आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरुगनंथम एम. मिलिंद मेश्राम, एमआयएमचे गटनेता शकील पटेल, मुस्लिम लिगचे गटनेता असलम मुल्ला खान, शिवसेना (उबाठा) गटनेता किशोर कुमेरिया, राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्या आभा पांडे, बसपाच्या गटनेत्या हर्षला जयस्वाल, शिवसेनेचे गटनेता गणेश चर्लेवार, गलिच्छ वस्ती निर्मूलन व घर बांधणी विशेष समिती सभापती रूतीका मसराम, स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती सभापती अश्विनी जिचकार, दुर्बल घटक समिती सभापती कु. लक्ष्मी हत्तीठेले उपस्थित राहणार आहे.

सर्वसामान्यांचे हक्काच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मनपातर्फे प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्र. २ अंतर्गत या प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रकल्पात एकूण ५१८ ईडब्ल्यूएस सदनिकांचा समावेश असून त्यांची रचना खालीलप्रमाणे आहे:

**२ बीएचके सदनिका:** ४५ चौ.मी. चटई क्षेत्रफळ असलेल्या एकूण ३०८ सदनिका

**१ बीएचके सदनिका:** ३० चौ.मी. चटई क्षेत्रफळ असलेल्या एकूण २१० सदनिका.

विशेष म्हणजे, यामध्ये दिव्यांग प्रवर्गातील नागरिकांकरिता ५% समांतर आरक्षण ठेवण्यात आले असून त्याअंतर्गत एकूण २६ सदनिका आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. नागरिकांना परवडणाऱ्या किमतीत घरे उपलब्ध करून देण्यासाठी या प्रकल्पाचे मूल्य अत्यंत आकर्षक ठेवण्यात आले आहे, यात १ इल्ळङ सदनिका: प्रति सदनिका किंमत रु. १५.५२ लक्ष. यामध्ये शासनाचे रु. २.५ लक्ष अनुदान वजा केल्यास नागरिकांना ही सदनिका केवळ रु. १३.०२ लक्ष या दरात उपलब्ध होणार आहे. २ इल्ळङ सदनिका: प्रति सदनिका किंमत रु. २१.०२ लक्ष. यामध्ये शासनाचे अनुदान वजा केल्यास नागरिकांना ही सदनिका रु. १८.५२ लक्ष या राशीला उपलब्ध होणार आहे.

या प्रकल्पातील सदनिकांसाठी नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून नागरिकांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. नागरिकांचा या योजनेला प्रचंड प्रतिसाद लाभला असून एकूण १,९१९ अर्ज प्राप्त झाले आहेत. या सर्व प्राप्त अर्जांमधून आज महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते संगणकीय पद्धतीने पारदर्शक 'लॉटरी' काढून ५१८ भाग्यवान अर्जदारांची निवड केली जाणार आहे.

## स्वतंत्रता दिवस के अवसर पर चिटनिस स्टेडियम में सामूहिक राष्ट्रगीत गायन हेतु नियोजन एवं समीक्षा बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आगामी स्वतंत्रता दिवस के अवसर पर नागपूर महानगरपालिका के शिक्षण विभाग की ओर से चिटनिस स्टेडियम में सुबह ८ बजे महानगरपालिका के सभी विद्यालयों के विद्यार्थियों द्वारा सामूहिक राष्ट्रगीत वंदे मातरम का गायन आयोजित किया जाएगा। वंदे मातरम् के १५० वर्ष पूर्ण होने के ऐतिहासिक एवं राष्ट्रीय महत्व को ध्यान में रखते हुए केंद्र स्तर से प्राप्त निदेशों के अंतर्गत इस विशेष कार्यक्रम का आयोजन किया जा रहा है।



कार्यक्रम के सफल, सुव्यवस्थित एवं गरिमापूर्ण आयोजन के लिए शिक्षण सभापति संतोष देवी दीपक लड्ढा की अध्यक्षता में नियोजन एवं समीक्षा बैठक आयोजित की गई। बैठक में विद्यार्थियों की सहभागिता, विद्यालयों के बीच समन्वय, विद्यार्थियों के अनुशासन एवं व्यवस्थापन, सांस्कृतिक एवं क्रीड़ा शिक्षकों की भूमिका तथा चिटनिस स्टेडियम में सामूहिक राष्ट्रगीत गायन के लिए आवश्यक व्यवस्थाओं के संबंध में विस्तृत चर्चा की गई। इस बैठक में शिक्षणाधिकारी वंदना महाजन, उपशिक्षणाधिकारी सुभाष उपासे, महानगरपालिका के विद्यालयों के सांस्कृतिक एवं क्रीड़ा शिक्षक तथा क्रीड़ा विभाग के पीयूष आंबुलकर उपस्थित रहे। इस अवसर पर विद्यार्थियों में राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकता, देशभक्ति एवं राष्ट्र के प्रति गौरव की भावना को और अधिक सुदृढ़ करने पर विशेष जोर दिया गया।

चिटनिस स्टेडियम में होने वाला यह सामूहिक राष्ट्रगीत गायन कार्यक्रम महानगरपालिका के विद्यालयों के विद्यार्थियों की एकजुट सहभागिता के माध्यम से वंदे मातरम् की १५०वीं वर्षगांठ के ऐतिहासिक अवसर को सम्मानित करते हुए राष्ट्रभक्ति एवं राष्ट्रीय एकता का संदेश देगा।

# ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबच्या ३०व्या छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजन रविवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लब, नागपूरच्यावतीने क्लबच्या ३०व्या वर्धापनदिनानिमित्त तसेच जागतिक छायाचित्रण दिनाचे औचित्य साधून ३० वी वार्षिक छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पत्रकार परिषदेत क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी माहिती दिली. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, विठोबा इंडस्ट्रीज, बंधन डिजिटल लॅब, अल्ताफ एच. वली तसेच इतर सहकाऱ्यांच्या




सहकार्याने आयोजित या स्पर्धेत वाइल्डलाइफ अँड नेचर, ट्रॅव्हल, स्ट्रीट अँड इव्हेंट आणि मोबाईल फोटोग्राफी अशा तीन विषयांचा समावेश आहे.

विजेत्यांना एकूण १ लाख ३५ हजार रुपयांपर्यंतची पारितोषिके देण्यात येणार आहेत. छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन रविवार, १६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र सभागृह, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार अभिजीत वंजारी उपस्थित राहणार असून, विठोबा इंडस्ट्रीजचे संचालक कार्तिक शेंडे व अल्ताफभाई हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. प्रदर्शनाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ बुधवार, १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विकास ठाकरे उपस्थित राहतील.

माजी कुलगुरू शरद निंबाळकर व बंधन लॅबचे अबी बानी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. १६ ते १९ ऑगस्ट दरम्यान सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे. तसेच विविध विषयांवर तज्ज्ञांची मार्गदर्शनपर कार्यशाळाही आयोजित करण्यात आली आहे. क्लबचे अध्यक्ष महेश काळबांडे, सचिव नरेश नेरकर, कोषाध्यक्ष नितेश बाहे, संयोजक डॉ. मातरिश्व व्यास तसेच सहसंयोजक राजन गुप्ता, चेतन जोशी व पंकज गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम होत आहे.

छायाचित्रप्रेमींनी प्रदर्शनास आवर्जून भेट देऊन स्पर्धकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले. असे पत्रकार परिषदेत अध्यक्ष महेश काळबांडे यांनी पत्रकारांना माहिती दिली. यावेळी उपस्थित महेश काळबांडे, नरेश नेरकर, चेतन जोशी, गजानन रानडे, राजन गुप्ता आणि अभी बानी यांची उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमासाठी नाना नाईक, रमाकांत झाडे, प्रदीप निकम, दिनेश मेहर हे सर्व परिश्रम घेत आहे .

# पोलिसांनी बालकांप्रती संवेदनशील व्हावे : विश्वास नांगरे पाटील

## राज्य बाल हक्क आयोगाकडून पोलिसांची कार्यशाळा, बाल न्याय अधिनियम व पोक्सो कायद्याबाबत जनजागृती कार्यशाळा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये कायदेशीर तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्याबरोबरच पोलिसांनी बालकांप्रती अधिक संवेदनशील आणि बालक-केंद्रित दृष्टिकोन ठेवून कार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, हॉप फॉर चिल्ड्रेन इंडिया आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बाल न्याय अधिनियम व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम याबाबत जनजागृती कार्यशाळा आणि नागपूर शहर व ग्रामीण पोलीस विभागातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बाल पोलीस अधिकारी, चाईल्ड हेल्पलाईन, बाल कल्याण समिती आणि बाल न्याय मंडळ यांच्यासाठी आयोजित कायार्शाळा पोलीस आयुक्तालय, नागपूर येथे संपन्न झाली.

बालकांच्या हक्कांचे संरक्षण, बालकांवरील लैंगिक अत्याचारास प्रतिबंध, संबंधित कायदेशीर तरतुदी तसेच बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये विविध यंत्रणांची भूमिका व जबाबदाऱ्या याबाबत कार्यशाळेत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या श्रीमती गीतांजली बुटी, सदस्य प्रवीण भुजाडे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस अधीक्षक दीपक अग्रवाल, नागपूर ग्रामीण अनिल मस्के, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्षा तथा न्यायाधीश भाग्यश्री कोठावळे, , महिला व बाल विकास विभागाच्या विभागीय उपायुक्त अर्पणा कोल्हे, माजी सदस्य महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग संजय सेंगर, बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष छाया राऊत तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांनी बाल संरक्षण व्यवस्थेची सद्यस्थिती, बालकांच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेला विविध विभागांमधील समन्वय तसेच बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये प्रभावी कार्यवाही करण्याबाबत माहिती दिली.

कार्यशाळेत गीतांजली बुटी, प्रवीण भुजाडे, न्या. भाग्यश्री कोठावळे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. तसेच माजी सदस्य महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग संजय सेंगर, हॉप फॉर चिल्ड्रेन फाऊंडेशनचे परम आनंद आणि वारिस शेख यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले.

यावेळी बालकांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, बालकांच्या हक्कांबाबत व्यापक जनजागृती तसेच विविध शासकीय व संबंधित यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचे मान्यवरांनी सांगितले. बालकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभाग, महिला व बाल विकास विभाग, बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती, चाईल्ड हेल्पलाईन तसेच स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने व संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यशाळेदरम्यान बालकांच्या संरक्षणाप्रती जनजागृती करणाऱ्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले. या माध्यमातून बालकांच्या हक्कांचे संरक्षण, सुरक्षित वातावरण आणि बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध याबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यशाळेच्या माध्यमातून बालकांच्या संरक्षणासाठी कार्यरत विविध यंत्रणांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कायदेशीर तरतुदी, कार्यपद्धती आणि बालक-केंद्रित दृष्टिकोनाबाबत मार्गदर्शन मिळाले.

# कला गौरव संस्था एक संस्कार केंद्र : सुदर्शन चक्रधर



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपुरातील ओंकार नगर परिसरातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेली "कला गौरव" संस्था ही एक संस्काराचे केंद्रच आहे. असे प्रतिपादन दैनिक राष्ट्र प्रकाशचे संपादक व राष्ट्रीय कवी सुदर्शन चक्रधर यांनी व्यक्त केले. समाज भवन ओंकार नगर येथे संस्थेच्या संचालित अनुराग संगीत विद्यालयाच्या "गुरुवंदना "कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुदर्शन चक्रधर तर प्रमुख अतिथी मा. संजय भाऊ ठाकरे (सामाजिक कार्यकर्ते व नगरसेवक) शितल कुमार जांभुळकर (शाखा व्यवस्थापक महाराष्ट्र बँक कळमेश्वर) संस्था अध्यक्षा प्रा. डॉ. संगीता बानाईत संस्था सचिव भागवत बानाईत, चंदाताई मानेकर, श्याम सुंदर साने मंचावर उपस्थित होते. वयाच्या ९४ वर्ष सुद्धा मी अजूनही विद्यार्थीच आहे असे मत असणारे जेष्ठ कलावंत श्याम सुंदर साने यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शना नंतर संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुरुवंदना या कार्यक्रमाला सुरुवात केली. सर्वप्रथम तबला शिक्षक अनुप तायडे यांचे मार्गदर्शना खाली विद्यार्थ्यांनी तबला, हार्मोनियम, व्हॉयोलीन यांचे सुरेल असे सामूहिक वादन केले. तर विद्यालयाच्या प्रमुख प्रा. डॉ. संगीता बानाईत यांचे मार्गदर्शना खाली विद्यार्थ्यांनी शास्त्रीय संगीतातील बंदिशी,तराना, ठुमरी, राग यमन वर आधारित सिनेगित मेडली, गझल, भक्ती गीते, अभंग, बालगीते, देशभक्तीपर गीत असे एकापेक्षा एक सरस गीतांचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

या कार्यक्रमात एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शेवटी विद्यार्थ्यांनी प्रा. डॉ. संगीता बानाईत आणि अनुप तायडे यांचा सन्मान केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेंद्र जाणे तर निवेदन प्रा. विजया बोंबटकर आणि आभार राहुल फुसे यांनी मानले. रिना उरकुडे व चिंतामण पराते यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनीषा आलोणे, ज्योत्स्ना वाडबुध्दे, प्रतिभा माहुलकर, रंजना घरडे, रुपल रामटेके, श्रेयश राजुरकर, अक्षता कडू, यशश्री वाडबुध्दे, आरूशी लोकडे, महेश भिवापूरकर, विलास कुबडे, नागसेन नगराळे, कृष्णा बाजीराव, जयश्री लोखंडे, लीना गहलोत, प्रज्ञा राऊत, विजयश्री वाडबुधे, नितु राज, प्रियंका कडू, कविता शेंडे, पूजा मानकर, प्रेरणा ढुमने, संजय घुमडवार, स्नेहल घुमडवार,कामिनी बानाईत, आरोही, अबीर, अभिजय, कादंबरी, स्पृहा, शामला, सान्वी, पार्थ, प्रणीत, ओजस, धनश्री, राधा, मोहक, शरद वाडबुध्दे, ईश्वर वाघ,नितीन झाडे, ई.यांनी परिश्रम घेतले.

# नगराध्यक्षा संजना मंदार मंगळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश, पौराणिक हेमांडपंथी शिव मंदिराला 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
सावनेर शहरातील पहलेपार येथील ऐतिहासिक हेमांडपंथी पुरातन शिव मंदिर देवस्थानाला 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा नागरी क्षेत्रातील दर्जा देण्यास मान्यता मिळाली आहे. दिनांक २० जुलै २०२६ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेत या महत्त्वपूर्ण प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. या मान्यतेचे 'क' वर्ग दर्जाचे प्रमाणपत्र जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडू यांच्या हस्ते सावनेर नगरीच्या प्रथम नागरिक तथा नगराध्यक्षा संजना मंदार मंगळे, हेमांडपंथी पुरातन शिव मंदिर देवस्थानचे अध्यक्ष लवकेश सेवके, कोषाध्यक्ष किशोर गुऱ्हारीकर, उपाध्यक्ष राजू घुगल, गटनेते रविंद्र ठाकूर तसेच नगरसेविका मनीषा खंगारे यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी मंदार मंगळे, सोमचंद सेवके, सदानंद मोवाडे, विनोद बागडे, मनीष खंगारे, पिंटू सातपुते यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. नुकत्याच पार पडलेल्या सावनेर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान नगराध्यक्षा संजना मंदार मंगळे तसेच प्रभाग क्र. ९ मधील नगरसेवक उमेदवारांनी आपल्या जाहीरनाम्यात हेमांडपंथी पुरातन शिव मंदिराला 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. दिलेले हे वचन आता प्रत्यक्षात साकार झाले आहे.

पालकमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे साहेब,सावनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख साहेब व विधान परिषद आमदार डॉ. राजीव पोतदार यांच्या विशेष पुढाकाराने, भाजप नेते रामरावजी मोवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगराध्यक्षा संजना मंदार मंगळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय मार्गी लागला आहे.

'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यामुळे हेमांडपंथी पुरातन शिव मंदिराच्या धार्मिक व ऐतिहासिक महत्त्वाला अधिकृत अधोरेखित मिळणार असून, मंदिर परिसराच्या विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. भाविकांसाठी आवश्यक सुविधा, परिसराचा विकास तसेच धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सावनेरच्या ऐतिहासिक व धार्मिक वैभवात भर घालणाऱ्या या निर्णयाचे शहरवासीय तसेच भाविकांकडून स्वागत करण्यात येत असून, दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाल्याने सावनेरच्या विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे.

# आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त प्रश्नमंजुषा




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
स्वच्छंद विद्यालय, मांडवा येथे अनुभव शिक्षा केंद्र नागपूरच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त 'ह्यभिन्न संदर्भ, समान आकांक्षा' या विषयावर प्रश्नमंजुषा व मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

अनुभव शिक्षा केंद्राचे जिल्हा प्रशिक्षक प्रकाश राठोड यांनी विविध उपक्रम व खेळांच्या माध्यमातून धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, प्रामाणिकपणा, पर्यावरण सुरक्षा व श्रमप्रतिष्ठा या मूल्यांवर मार्गदर्शन केले. युवकांनी सामाजिक जबाबदारी स्वीकारून नेतृत्वाच्या माध्यमातून समाजाच्या विकासात योगदान द्यावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. प्राचार्य भुते यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी राजेश बहरुपी व कुहिटे यांनी सहकार्य केले.

# राम गणेश गडकरी महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथालय दिन उत्साहात

## ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचे भांडार, विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कृती जोपासावी : प्रा.डॉ. दीपावली टेकाडे




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
स्थानिक राम गणेश गडकरी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, सावनेर येथे नुकताच राष्ट्रीय ग्रंथालय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि ग्रंथालयाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या शोभा ताजणे तर प्रमुख अतिथी म्हणून नंदकृपा ग्रामीण विकास बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या संचालिका प्रा.डॉ.दीपावली टेकाडे तसेच प्रा.गायकवाड मॅडम, प्रा. कान्तेश्वर बोरीकर, प्रा. दशरथ बोबडे व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. डॉ. दीपावली टेकाडे यांनी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे महत्त्व समजावून सांगत वाचनामुळे ज्ञान, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते म्हणून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करून वाचनसंस्कृती विकसित करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य शोभा ताजणे यांनी डॉ. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्रातील पाच सिद्धांतांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. ग्रंथपाल चिमलवार यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. सूत्रसंचालन प्रा. अर्चना देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विद्या ठाकरे यांनी केले.

यावेळी प्रा. कपिल खुबाळकर, प्रा. बावणे, प्रा. पाटील, प्रा. नीता ठाकरे, प्रा. ममता सावजी, प्रा. माडेकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

## आंतरराष्ट्रीय युवा दिन आणि वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
एक पेड माँ के नाम या अभियानांतर्गत प्राचार्य डॉ. अर्चना चौधरी यांनी वृक्षारोपण करून आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त नूतन आदर्श आर्ट्स, कॉमर्स व श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड येथे राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रा. लोमेश बावनकुळे कार्यक्रम अधिकारी रा. से. यो. यांनी युवांसमोरील समस्या आणि संधी या विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी आजच्या युवकांसमोरील विविध सामाजिक, शैक्षणिक व रोजगारविषयक आव्हाने तसेच उपलब्ध असलेल्या विविध संधींची माहिती आणि स्वच्छतेचे महत्त्व या संबंधित माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. युवकांनी बदलत्या काळानुसार कौशल्ये आत्मसात करून राष्ट्राच्या विकासात सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी प्रा डॉ संजीव कोंडेकर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. युवक हे देशाची भावी शक्ती असून त्यांच्या सकारात्मक विचारांना, सर्जनशीलतेला आणि नेतृत्वगुणांना योग्य दिशा मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, राष्ट्रीय सेवा योजना सह कार्यक्रम अधिकारी डॉ रुपेश खुबाळकर, रेड रिबन क्लबचे सदस्य तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये युवा शक्ती, सामाजिक जबाबदारी, नेतृत्वगुण आणि राष्ट्रनिमार्णाची भावना विकसित करण्याचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत प्राचार्य डॉ. अर्चना चौधरी, डॉ. विनयकुमार उपाध्याय, प्रा. विनोद मांडवकर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. संजीव कोंडेकर, डॉ. अमोल आवंडकर, डॉ. मोरेश्वर शेंडे, डॉ. रुपेश खुबाळकर, प्रा. लोमेश बावनकुळे, प्रा. सिकंदर पवार, प्रमोद राऊत, डॉ. सोबल जॉर्ज,प्रा. माधुरी वरभे, प्रा. अश्विनी बुरिले, प्रा. दीप्ती आंबिलडुके, प्रा. स्नेहाली पौणीकर तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी एकत्रितपणे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

## ओजस्वी कुलसंगेला राष्ट्रीय कराटे स्पर्धेत दुहेरी कांस्य

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नवी दिल्ली येथील तालकटोरा इनडोअर स्टेडिअममध्ये ७ ते ९ ऑगस्ट दरम्यान पार पडलेल्या ऑल इंडिया इंडिपेंडन्स कप कराटे चॅम्पियनशीपमध्ये ओजस्वी कोमील कुलसंगे हिने वैयक्तिक काता व कुमिते या प्रकारात दुहेरी कांस्यपदकाची कमाई केली. सेईको काई कराटे इंटरनॅशनल इंडिया अँड भारत कराटे ॲकॅडमीच्यावतीने ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत देशभरातील कराटे स्पर्धेक सहभागी झाले होते. ओजस्वी ही नारायणा विद्यालयाची आठव्या वर्गाची विद्यार्थिनी असून गौरा डोजो येथे मागील चार वर्षांपासून कराटेचे प्रशिक्षण घेत आहे. नुकतीच तीने नागपुरात झालेल्या मित्सुया काई इंटर-डोजो कराटे चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत सुवर्णपदक व कांस्यपदक पटकावले होते. तिने यशाचे श्रेय तिने आई डॉ. भावना कुलसंगे व परिवार तसेच, प्रशिक्षक सचिन लोहकरे यांना दिले आहे.



## श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेजमधे स्तनपान जागरूकता रॅली




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेजच्या गृह अर्थशास्त्र विभागातर्फे स्तनपान सप्ताह अंतर्गत स्तनपान जागरूकता रॅली काढण्यात आली. मातांमध्ये स्तनपानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी व त्याचे महत्त्व त्यांना समजावे या दृष्टिकोनातून रॅलीमध्ये घोषणा देण्यात आल्या. तसेच विद्यार्थ्यांनी स्तनपानाच्या जागरूकते विषयीचे फलक तयार करून परिसरातील जनतेला त्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या रॅलीच्या सुरुवातीस महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर यांनी हिरवी झेंडी दाखवून विद्यार्थ्यांना संबोधित केले. गृह अर्थशास्त्र विभागाच्या डॉ. सुरेखा गुडधे व वैशाली चौधरी यांनी रॅलीचे यशस्वी आयोजन केले. रॅलीमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह सर्व प्राध्यापकांनी सहभाग दर्शविला.

## चालू शैक्षणिक सत्रासाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रीया सुरु

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
सन २०२६-२७ या वर्षासाठीचे शासकीय वसतीगृह प्रवेशाच्या सर्व अभ्यासक्रमाचे वसतिगृह प्रवेशाचे मोफत प्रवेश प्रकीया सुरु करण्यात आलेली आहे. वसतीगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता hmasnew.mahait.org या पोर्टलचा वापर करावा, असे आवाहन समाज कल्याण विभागातर्फे करण्यात आले आहे. व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी वसतिगृह प्रवेशासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर या कार्यालयाच्या अधिनस्त नागपूर जिल्ह्यात शहरी भागात मागासवर्गीय मुलामुलींसाठी एकूण १४ वसतीगृहे तसेच तालुका स्तरावर मागासवर्गीय मुलामुलींसाठी एकूण ११ असे एकूण २५ शासकीय वसतीगृह नागपूर जिल्ह्यात कार्यान्वित आहेत.

थोडक्यात

## व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी, शासकीय वसतिगृहात ३१ ऑगस्टपर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरु

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता इतर मागास प्रवगार्तील मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रीया सुरु झाली आहे. शासनाच्या https://hmas.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर बारावीनंतर व्यावसायिक व अव्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह प्रवेशाकरीता दिनांक ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज भरुन अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधीत वसतिगृह/या कार्यालयात विहीत मुदतीत सादर करावी, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक रोहन कांबळे यांनी केले आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुलामुलींच्या वसतिगृहामध्ये बारावी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम वसतिगृह प्रवेशाकरीता अर्ज भरावा. मेरीट लिस्ट प्रमाणे वसतिगृहातील प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाचा लाभ मिळाला नाही. त्या विद्यार्थ्यांचे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेमध्ये रुपांतरीत करण्यात येईल.

नागपूर विभागात मुलांचे शासकीय वसतिगृहामध्ये व्यावसायिक उपक्रमासाठी १६ रिक्त जागा तर अव्यावसायिक जागा १५ आहेत. मुलींच्या शासकीय वसतिगृहात व्यावसायिक जागा ५ तर अव्यावसायिक जागा ७ आहेत. नागपूर जिल्ह्यातील इमाव, विमाप्र, विजाभज, दिव्यांग, अनाथ व आद्रुमा या विद्यार्थ्यांनी वसतिगृह तसेच आधार व स्वयंम योजनेचा लाभ घ्यावा. आवश्यक माहितीसाठी ओबीसी मुलामुलींचे वसतिगृह, नागपूर येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण या कार्यालयाशी संपर्क साधावा.

## "पॉश"ची अंमलबजावणी न करणाऱ्या राज्यातील ६७२ कार्यालयांना कारणे दाखवा नोटीसा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पॉश अँक्ट २०१३ मधील तरतुदी व मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे आदेशानुसार पूर्तता केली किंवा नाही यासाठी राज्यातील शासकीय व खाजगी कार्यालये, संस्था, कंपन्या, त्यांच्या शाखांची राज्याच्या महिला व बाल विकास विभागामार्फत ४ हजारपेक्षा जास्त तपासणी अधिकाऱ्यांकडून जूनपासून तपासणी सुरु केली आहे. सदयस्थितीत राज्यातील ३ हजार ५७९ शासकीय व ३ हजार २९६ खाजगी कंपन्या/कार्यालय अशा एकूण ६ हजार ८७५ तपासण्या करण्यात आल्या असू न २९४ शासकीय व ३७८ खाजगी कार्यालयांना पूर्तता न केल्याबद्दल जिल्हा स्तरावरुन राज्यात एकूण ६७२ कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. नोटीसा दिलेल्या कार्यालयांनी विहीत वेळेत पूर्तता न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार ५० हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याची कारवाई संबंधीत जिल्हा अधिकारी व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कडून करण्यात येत आहे.

नागपूर जिल्हातील शासकीय १४४ व खाजगी २६९ कंपन्या/कार्यालयांची तपासणी करण्यात आली असून ९ शासकीय व १८ खाजगी कार्यालयांना पूर्तता न केल्याबददल जिल्हा स्तरावरुन कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. जिल्हातील सर्व शासकीय व खाजगी कार्यालये, संस्था, कंपन्या, त्यांच्या शाखांनी Posh Act-२०१३ मधील तरतुदी व मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे आदेशानुसार त्यांचे कार्यालयाची केंद्र शासनाच्या SHE BOX PORTAL वर नोंद, अंतर्गत समितीची स्थापना व नोंद, समितीचे प्रशिक्षण, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, वार्षीक अहवाल आदीवरील पोर्टल अद्यावत करणे बंधनकारक आहे. तपासणीवेळी पूर्तता केली नसल्याचे आढळून आल्यास संबंधित कार्यालये/संस्था / कंपन्या यांचेवर अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई कारवाई करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

# उभ्या ट्रकला कारची धडक; दोघांचा मृत्यू, एक गंभीर

### वाढदिवस साजरा करण्यासाठी निघालेल्या मित्रांच्या कारला अपघात, कळमना भागातील घटना



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वाढदिवस साजरा करण्यासाठी कारने निघालेल्या तीन मित्रांच्या वाहनाला पावनगाव ते भरतवाडा वाय-पॉइंट मार्गावर बुधवारी (१२ ऑगस्ट) पहाटे भीषण अपघात झाला. भरधाव कार रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकवर मागून आदळल्याने हा अपघात झाला. धडक एवढी जोरदार होती की कारचा अक्षरशः चुराडा झाला.

या भीषण अपघातात कारमधील दोन तरुणांचा मृत्यू झाला, तर एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. जखमी तरुणाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच कलमना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून अपघाताचा तपास सुरू केला आहे. भरधाव वाहन चालविल्यामुळे हा अपघात झाला असण्याची शक्यता असून, नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

# अचूक व अद्ययावत मतदार याद्यांसाठी बीएलओंनी समन्वयाने काम करावे !

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत पात्र मतदारांचे नाव मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून वंचित राहू नये व ही यादी अधिक अचूक व अद्ययावत व्हावी, यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी राजकीय पक्षांच्या संबंधित केंद्रस्तरीय प्रतिनिधींशी समन्वय साधून प्रक्रियेला गती द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज बीएलओंच्या आढावा बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीमेचा आढावा घेतला. यावेळी अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. रचना इंदूरकर, मतदार नोंदणी अधिकारी श्रीमती शिल्पा सोनोले, प्रशांत कुमावत, विवेक साळुंके तर उर्वरित मतदार नोंदणी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.



विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत गणना प्रपत्र प्राप्त न झालेल्या मतदारांची यादी बीएलए यांना उपलब्ध करून मतदारांची पडताळणी करण्याच्या सूचना आयोगाने दिल्या आहेत. यामध्ये गैरहजर, स्थलांतरित, मृत आणि दुबार असे वर्गीकरण असून अशा मतदारांची योग्यरितीने पडताळणी करून त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात यावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. गणना प्रपत्रांचे डिजिटायझेशन प्रक्रिया सुरू असून गैरहजर, स्थलांतरित, मृत आणि दुबार गटातील मतदारांची मतदान केंद्रनिहाय यादी बीएलओंना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

गणना प्रपत्र भरून घेण्यासाठी आता पाच दिवसांचा कालावधी शिल्लक असल्याने संबंधित बीएलओं यांनी त्या याद्या संबंधित बीएलए यांना उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले तसेच त्यांच्या सहकायार्ने संबंधित मतदारांच्या प्रत्यक्ष निवासस्थानी पडताळणी व संपर्क साधून पात्र मतदारांकडून गणना प्रपत्र भरून घेण्याची कार्यवाही करावी असे ते म्हणाले .

या यादीमध्ये दररोज होणाऱ्या अद्ययावत नोंदी संबंधित बीएलए यांना उपलब्ध करून द्याव्या. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती निवडणूक आयोगाने दिलेल्या ECINET या अँपवर वेळेत अपलोड करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरही गैरहजर, स्थलांतरित, मृत आणि दुबार मतदारांची यादी संबंधित शासकीय कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# नागपुरात १३ ऑगस्टपासून जिल्हास्तरीय रानभाजी व सेंद्रिय उत्पादन विक्री महोत्सव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ग्रामीण तसेच शहरी नागरिकांना नैसर्गिकरीत्या उपलब्ध होणाऱ्या रानभाज्यांचे आरोग्यविषयक महत्त्व आणि स्थानिक सेंद्रिय उत्पादनांची माहिती मिळावी, यासाठी जिल्हास्तरीय रानभाजी व सेंद्रिय उत्पादन विक्री महोत्सव- २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा-आत्मा आणि कृषी विभाग, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव गुरुवार १३ व शुक्रवार १४ ऑगस्ट रोजी रामनगर मैदान, नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

महोत्सवात दोन्ही दिवशी सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत रानभाज्या, सेंद्रिय कृषिमाल,



रुचकर व पारंपरिक खाद्यपदार्थ तसेच स्थानिक सेंद्रिय कृषी उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करण्यात येणार आहे. शेतकरी गट आणि महिला गटांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या रानभाज्या उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये केना, कुंजरू, खापरखुटी, चिवळ, कपाळफोडी, टाकळा/तरोडा, मायाळू, कुरडू, शेवळा, करटोली, काटेमाठ, हादगा (हेती), दिंडा भाजी, शेवगा, आघाडा, कमळून भाजी आणि अंबाडी भाजी यांसह हंगामी फळे आणि विविध स्थानिक सेंद्रिय उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील.

महोत्सवाचे उद्घाटन १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे कृषी, वित्त, नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आणि विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या रानभाज्या व पालेभाज्या, फळभाज्या आणि कंदभाज्यांमध्ये प्रथिने, खनिजे आणि जीवनसत्त्वे यांसारखे शरीरासाठी आवश्यक पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात. त्याचबरोबर त्यांच्यामध्ये औषधी गुणधर्मही असल्याने या भाज्यांचे आरोग्यविषयक महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा या महोत्सवाचा उद्देश आहे. नागरिकांनी महोत्सवाला भेट देऊन पारंपरिक व पौष्टिक रानभाज्यांची माहिती घ्यावी तसेच स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक अमित डोंगरे (मो. ८६२३०५९१११) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## १८४३ किमी सायकल प्रवास करणाऱ्या निलेश गुरुनुलेचा सायकल स्नेही मंडळातर्फे सन्मान

### १३ दिवसांचा जिद्दी प्रवास, सायकलप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन



**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोली शहरातील हनुमान वॉर्ड येथील वृत्तपत्र वितरक निलेश विलास गुरुनुले या युवकाने केवळ जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर गडचिरोली ते केदारनाथ धाम असा तब्बल १८४३ किलोमीटरचा सायकल प्रवास १३ दिवसांत पूर्ण केला. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सायकल स्नेही मंडळ, गडचिरोली यांच्या वतीने १३ ऑगस्ट रोजी सायकल भेट व विशेष सत्कार करण्यात येणार आहे. निलेश गुरुनुले याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सायकलवरून केलेला हा प्रवास अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्याच्या जिद्दीचे आणि धाडसाचे कौतुक करण्यासाठी सायकल स्नेही मंडळाच्या वतीने हा विशेष उपक्रम मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये आयोजित करण्यात आला आहे. हा सत्कार समारंभ १३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता वसंत विद्यालय, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी निलेश गुरुनुले यांना सायकल भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. आपली उपस्थिती व सहकार्य एका जिद्दी सायकलपटूच्या पुढील प्रवासाला नवी दिशा देईल, असे आवाहनही मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला बंडोपंत बोढेकर, प्रा. विलास पारखी, उदय धकाते, मीरा चौधरी, सुचिता कामडी, मुरलीधर दोनाडक, प्रा. अरुण पालारपवार, डॉ. चंद्रकांत लेनगुरे, प्रा. उल्हास आखाडे, उपेंद्र द्रोहणकर, डॉ. योगेश पाटील, प्रा. संतोष संगनवार, प्रा. ज्ञानेश्वर धकाते, माधुरी बागडे बोरकर, साळवे (बल्लारपूर), वैभव बारेकर, डॉ. शुभम मोंढे, प्रा. सुनिता विजय साळवे आणि भाविक ठक्कर आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सायकलप्रेमी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या जिद्दी सायकलपटूला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन उदय धकाते, जिल्हा सरचिटणीस, सायकल स्नेही मंडळ, गडचिरोली यांनी केले आहे.

# विदर्भ नामदेव शिंपी समाजातर्फे दीपक पसारकर सन्मानित

### सामाजिक कार्यातील १८ वर्षांच्या योगदानाची दखल



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सामाजिक कार्याच्या माध्यमातून वंचित, उपेक्षित आणि गरजू घटकांना आधार देत गेल्या १८ वर्षांपासून अविरतपणे कार्यरत असलेले दीपक पसारकर यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेत विदर्भ नामदेव शिंपी समाजाच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

कुकडे लेआउट, जुना बाभूळखेडा, नागपूर येथील विदर्भ नामदेव शिंपी समाज संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात दीपक पसारकर यांचा सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याची समाजबांधवांनी मुक्तकंठाने प्रशंसा करीत पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दीपक पसारकर हे गेल्या १८ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. ते सह्याद्री फाउंडेशनचे सहसंचालक असून, बेघर, भिक्षेकरी तसेच मनोरुग्ण महिला-पुरुषांसाठी सातत्याने कार्य करीत आहेत. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या या घटकांना केवळ मदत न करता त्यांना उपचार, रोजगार आणि पुनर्वसनाच्या माध्यमातून सन्मानाने जगण्याची संधी मिळवून देणे, हे त्यांनी आपल्या कार्याचे ध्येय ठेवले आहे.

सह्याद्री फाउंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविताना गरजू व्यक्तींना आधार देण्याबरोबरच त्यांचे पुनर्वसन करून त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने पसारकर यांचे कार्य सुरू आहे.

# लता मंगेशकर हॉस्पिटलतर्फे भव्य 'अवयवदान जनजागृती' रॅली

### अवयवदान करा आणि जीवन वाचवाचा दिला संदेश, डॉक्टर, शिक्षकगण व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अवयवदानाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर यांच्या वतीने भव्य अवयवदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. उपअधिष्ठाता व वैद्यकीय अधीक्षक डॉ नितीन देवस्थळे यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ केला. रॅलीच्या माध्यमातून हॉस्पिटल परिसर तसेच आजूबाजूच्या भागात नागरिकांमध्ये अवयवदानाबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली.




या रॅलीमध्ये एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय, लता मंगेशकर हॉस्पिटल, रणजीत देशमुख दंत महाविद्यालय, व्हीएसपीएम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी व माधुरीबाई देशमुख कॉलेज ऑफ नर्सिंग एज्युकेशनचे डॉक्टर्स, शिक्षकगण, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात जनजागृतीपर फलक घेऊन आणि अवयवदानाचा संदेश देत सहभागी लोकांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

अवयवदान म्हणजे मृत्यूनंतरही अनेकांना नवजीवन देण्याची मानवतेची महान संधी आहे. हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसे यांसह विविध अवयवांचे दान केल्यामुळे गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना जीवनदान मिळू शकते. तसेच नेत्रदानामुळे दृष्टी गमावलेल्या व्यक्तीच्या आयुष्यात प्रकाश निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अवयवदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

अधिष्ठाता डॉ सजल मित्रा यांच्या मार्गदर्शनात 'अवयवदान करा आणि लोकांचे प्राण वाचवा', हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला. समाजात अवयवदानाची सकारात्मक भावना निर्माण करून अधिकाधिक नागरिकांना अवयवदानासाठी प्रेरित करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

रुग्णालयाचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर डॉ. अनुज तिवारी, उपअधीक्षक डॉ. सुश्रुत फुलारे, किडनी रोग तज्ञ डॉ. निलेश राघोर्टे व डॉ. मोहित कुरुंदवाडकर, ऑन्को सर्जन डॉ. जनक थडाणी, इंटेन्सिव्हिस्ट डॉ. राकेश ढोके, मेट्रन रिटा जॉन, अवयव प्रत्यारोपण समन्वयक कांचन शेवडे यांची प्रमुख उपस्थिती या रॅलीमध्ये होती. पोलीस विभागाचे सहकार्य या रॅलीला मिळाले. अवयवदानाबाबत जनजागृती वाढविण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे केलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला.